रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १३६
www.ramprahar.com
◆ बुधवार, ३ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अनुभवाचा फायदा महाराष्ट्राला करून देणार -मुख्यमंत्री



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत त्यांचा २०२९पर्यंतचा रोडमॅप सांगितला आहे. मला माझ्या सध्याच्या कार्यकाळात खूप बदल करायचे आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे आहेत. माझ्या अनुभवाचा फायदा महाराष्ट्राला कसा देता येईल यासाठी प्रयत्न करीत असून परिवर्तन कसे घडवता येईल, शाश्वत कसे करता येईल याकडे अधिक लक्ष द्यायचे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. मी एक अनुभवी म्हणून मुख्यमंत्रिपदावर बसलो आहे. प्रशासन आतून बाहेरून पाहिले आहे. अडचणी काय येतात त्याची कल्पना आहे. या सगळ्या अनुभवाचा महाराष्ट्राला कसा फायदा करून देता येईल यासाठी माझा प्रयत्न आहे. २०२९पर्यंत पूर्ण क्षमतेने काम करायचे हे माझे ध्येय आहे. २०२९नंतर पक्ष ठरवेल ती जबाबदारी घेईन, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

### अंतरंग
भाजपच्या प्रयत्नाने मोहोपे रेल्वेस्थानकाचे नाव पोयंजे/३
मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय; पोलिसांची कारवाई/६
राज्य तायक्वांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर/८

नगरपालिका निवडणूक रणसंग्राम

# मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील २६४ नगर परिषदा आणि नगरपंचायतींसाठी मंगळवारी (दि. २) मतदान प्रक्रिया पार पडली. या वेळी काही ठिकाणी वादाचे प्रसंग घडले, परंतु मतदान भरघोस झाले. रायगड जिल्ह्यात १० नगर परिषदांसाठी सुमारे ७० ते ७५ टक्के मतदान झाले आहे.

राज्यात २४६ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींची निवडणूक जाहीर झाली होती. न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे २४ नगरपालिकांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या, तर १५४ नगरसेवकपदाच्या निवडणुकाही





लांबणीवर पडल्या आहेत. उर्वरित पालिकांसाठी मंगळवारी मतदान झाले.

रायगड जिल्ह्यात अलिबाग, पेण, मुरूड जंजिरा, रोहा, श्रीवर्धन, महाड, उरण, खोपोली, कर्जत, माथेरान या १० नगर परिषदांसाठी मतदान प्रक्रिया झाली. १० नगराध्यक्षपदांसाठी ३४, तर नगरसेवकाच्या २०९ जागांसाठी ५७५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. बहुतांश ठिकाणी मतदानासाठी मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. प्रशासनाने मतदानाकरिता तयारी केली होती, तर मतदान केंद्र परिसरात पोलिसांचा बंदोबस्त होता. महाडमधील हाणामारी आणि अन्य ठिकाणचे तुरळक प्रकार वगळता मतदान शांततेत झाले. काही केंद्रांत मतदान यंत्रामध्ये बिघाड झाल्याने प्रक्रिया थांबविण्यात आली होती.

नगरपालिका निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर दुसऱ्या दिवशी मतमोजणी होणार होती, पण वादग्रस्त जागांच्या याचिकेमुळे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सर्वच नगरपालिकांची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्याचा निर्णय दिला आहे. परिणामी निकालासाठी तोपर्यंत वाट पहावी लागणार आहे.

## सर्व ठिकाणचा निकाल आता २१ डिसेंबरला!

### हायकोर्टाचा मोठा निर्णय

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबर रोजी एकत्र जाहीर करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मंगळवारी (दि. २) दिला. यासोबतच २० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम राहिल, असेही कोर्टाने स्पष्ट केले असून तोपर्यंत एक्झिट पोल प्रसिद्ध करण्यासही बंदी असणार आहे.

सुरुवातीला राज्य निवडणूक आयोगाने २ डिसेंबरला मतदान आणि ३ डिसेंबरला निकाल लागेल, असे जाहीर केले होते, मात्र काही नगरपालिकांमध्ये न्यायालयीन पेच निर्माण झाल्याने दोन दिवसांपूर्वी आयोगाने तेथे २० डिसेंबर रोजी मतदान आणि २१ डिसेंबरला निकाल असा नवीन आदेश दिला, तर उर्वरित सर्व ठिकाणी मंगळवारी मतदान आणि बुधवारी मतमोजणी होणार होती, मात्र सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत; अन्यथा उर्वरित निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर हायकोर्टाच्या खंडपीठाने सर्व नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत.



> *असं पहिल्यांदा घडतंय की घोषित केलेल्या निवडणुका, त्याचे निकाल पुढे चालले आहेत. नागपूर खंडपीठ स्वायत्त आहे, निवडणूक आयोगही स्वायत्त आहे. त्यांचा निर्णय मान्य करावा लागेल, पण यंत्रणेच्या चुकांमुळे अशा गोष्टी होणे योग्य नाही. या सगळ्या प्रक्रियेत निवडणूक आयोगाने सुधारणा केली पाहिजे.*
>
> **-देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री



**उरण : येथील नगर परिषद निवडणुकीत आमदार महेश बालदी यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.**

### नवमतदारांसह वधूनेही बजावला मतदानाचा हक्क



**कर्जत :** रायगड जिल्ह्यात नगर परिषद निवडणुकीसाठी पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या नवमतदारांमध्ये उत्साह दिसून आला. तरुण, तरुणींनी आवर्जून मतदान केले. त्याचबरोबर एका वधूने वेळ काढून मतदानाचा हक्क बजावला. कर्जतमधील वृषाली रंभाजी कर्णूक हिचे लग्न मंगळवारी होते. तिने वडिलांबरोबर येऊन मतदान केले आणि नंतर ती विवाह सोहळ्यासाठी रवाना झाली.

## महाड येथे राष्ट्रवादी आणि शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये राडा

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषदेच्या निवडणुकीत मतदानाच्या वेळी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. त्यामुळे महाडमध्ये तणाव निर्माण झाला.

महाडमधील शाळा क्रमांक पाच येथील प्रभाग क्रमांक दोन व तीनमधील मतदान केंद्राबाहेर राष्ट्रवादी आणि शिवसेना या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मतदानासाठी



गर्दी केली होती. मतदानासाठी येणारे मतदार वगळता बाहेरून मोठ्या प्रमाणावर आलेल्या नागरिकांमुळे मतदान प्रक्रियेवर ताण पडत असल्याने त्यांना दूर करण्याची मागणी पोलीस यंत्रणेकडे करण्यात येत होती.

दरम्यान, शिवसेना युवा नेते विकास गोगावले सकाळपासून महाड शहरात नगर परिषद निवडणुकीचा आढावा घेत होते. दुपारी १च्या सुमारास नवेनगर शाळा क्रमांक पाच येथील मतदान केंद्राबाहेर गोगावले व त्यांचे कार्यकर्ते आले असता त्यांची आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेश उपाध्यक्ष सुशांत झांबरे व त्यांचे कार्यकर्ते यांच्यात बाचाबाची झाली. (पान २ वर..)

### निवडक

#### पीएम ऑफिस 'सेवा तीर्थ' नावाने ओळखले जाणार

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने पंतप्रधान कार्यालयाचे नाव बदलण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सेंट्रल विस्टा प्रकल्पांतर्गत उभारल्या जात असलेल्या नव्या पीएम ऑफिसला आता 'सेवा तीर्थ' असे नाव दिले गेले आहे. देशाशी संबंधित सर्वात महत्त्वाचे निर्णय ज्या ठिकाणी घेतले जातात, त्या कार्यकारी केंद्राला नवे नाव देत शासन म्हणजे सेवा हा संदेश अधोरेखित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

#### संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गदारोळ; कामकाज तहकूब

**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला मंगळवार (दि. २)पासून सुरुवात झाली. या वेळी विरोधी पक्ष सदस्यांनी विविध मुद्द्यांवर केलेल्या घोषणाबाजीमुळे दोन्ही सभागृहांच्या कामकाजात अडथळे आले. यावर सभापतींनी नाराजी व्यक्त केली आणि कामकाज सुरू ठेवण्याचे आवाहन केले. यानंतरही घोषणाबाजी सुरूच राहिल्याने कामकाज उद्यापर्यंत तहकूब करण्यात आले.

## सहलीच्या बसला कराडमध्ये अपघात
# ४२ विद्यार्थी जखमी, चौघे गंभीर



**सातारा : प्रतिनिधी**

कोकणात सहलीसाठी गेलेल्या नाशिकमधील विद्यार्थ्यांच्या बसला परतीच्या प्रवासात सातारा जिल्ह्यातील कराड येथे मंगळवारी (दि. २) अपघात झाला. या अपघातात ४२ विद्यार्थी जखमी झाले असून त्यातील चारजण गंभीररित्या जखमी असल्याची प्राथमिक माहिती आहे. सर्व जखमी विद्यार्थ्यांना कराडच्या रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे.

नाशिकच्या निफाडमधील बी.पी. महाविद्यालयाचे विद्यार्थी सहलीसाठी कोकणात गेले होते. कोकणातून सातारामार्गे नाशिकला परतत असताना पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर मंगळवारी पहाटे या बसचा अपघात झाला. वाठार (ता. कराड) गावच्या हद्दीत पुलाचे काम सुरू आहे. पहाटे अंधार असल्याने बसचालकाला रस्त्याच्या परिस्थितीचा अंदाज आला नाही. अशा स्थितीत बस भराव पुलावरून खाली कोसळली.

अपघाताची माहिती मिळताच कराड ग्रामीण आणि महामार्ग मदत केंद्राच्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वाठार ग्रामस्थांनीही पोलिसांना मदत केली. जखमी विद्यार्थ्यांमधील १० जणांवर कराडच्या वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर इतर ३२ जणांना कराडच्याच कृष्णा रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. चार विद्यार्थी गंभीर जखमी असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.





**कर्जत, खोपोली : भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगर परिषद निवडणूक मतदानाच्या दिवशी विविध ठिकाणच्या बूथना भेट देऊन मतदारांशी संवाद साधला. या वेळी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, इतर पदाधिकारी, उमेदवार, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## महाराष्ट्र 'राजभवन' झाले आता 'लोकभवन'

**मुंबई :** केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनाचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत. राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे, असे राज्यपालांनी सांगितले. 'लोकभवन' हे सरकार आणि राज्यातील जनतेमध्ये सेवा, सहकार्य व संवादाचा सेतू व्हावे हीच या नामांतरामागची भूमिका आहे, असेही ते म्हणाले.

# अखेर सिडको प्रशासनाला जाग!

### चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या कामाला लवकरच होणार सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या नैना प्रकल्पांतर्गत येणाऱ्या चिपळे पूल ते नेरे रस्त्याच्या दुरूस्तीसंदर्भात अखेर सिडको प्रशासन जागे झाले असून या रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहे. या विषयी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे लक्ष वेधून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली होती. त्यानुसार नागरिकांचा हा प्रश्न निकाली लागला आहे.

चिपळे पूल ते नेरे हा अत्यंत महत्त्वाचा आणि दररोजची रहदारी असलेला रस्ता असून सध्या त्याची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. यापूर्वी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत होता, मात्र त्याचे सिडकोकडे हस्तांतरण झाल्यानंतर तो नैना हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे. या रस्त्यावरील मोठमोठे खड्डे आणि उखडलेल्या भागांमुळे नागरिकांची ये-जा अत्यंत धोकादायक व त्रासदायक झाली आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये सिडकोविरोधात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

नागरिकांची मागणी आणि त्यांना होणाऱ्या गैरसोयीची दखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना निवेदन देऊन सिडको अधिकाऱ्यांना या रस्त्याची दुरुस्ती तातडीने करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली होती तसेच हा रस्ता प्रचंड वर्दळीचा असल्याने त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. त्यानुसार सिडकोच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असल्याचे भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांना सांगितले. यामुळे प्रवासी नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



# रायगडात नगर परिषद निवडणुकीसाठी भरघोस मतदान

## उरणमध्ये १७,८०५ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क, ६७.९२ टक्के मतदान

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक किरकोळ प्रकार वगळता शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आली.या निवडणुकीत उरण शहरातील नागरिकांसह वयोवृद्धानीही मतदानाचा हक्क बजावला. दुपारी ३:५० वाजेपर्यंत ५१ टक्के मतदानाची नोंद झाली होती.सायंकाळी ५.३० वाजता ६७.९२ टक्के मतदान झाले असुन एकूण १७ हजार ८०५ मतदारांनी हक्क बजावल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. उद्धव कदम यांनी दिली.



नगराध्यक्ष पदासाठी उभे असलेल्या चार व एकूण १० प्रभागातील २१ नगरसेवकांच्या जागांसाठी निवडणुकीच्या आखाड्यात उभे असलेल्या ४८ असे एकूण ५२ उमेदवारांचे भवितव्य काल २ डिसेंबर रोजी सायंकाळी ५:३० वाजता शिलबंद झाले असून आज ३ डिसेंबर रोजी होणारी मतमोजणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाणे २१ डिसेंबरला घेण्याचे निर्देश आहेत.त्यामुळे सर्वच उमेदवारांचे मतदान यंत्रात शिलबंद झालेले भवितव्य तब्बल १९ दिवसांच्या लांबणीवर गेल्याने उमेदवारांची धाकधूक अधिक वाढली आहे.

नगराध्यक्षपदासाठी भाजपकडून कोळी शोभा-शाह महाविकास आघाडीच्या वतीने भावना कुंदन घाणेकर, शिंदे गटाकडून रुपाली तुषार ठाकूर, तर अपक्ष म्हणून शेख नसरीन इसरार या चार उमेदवारांची नावे आहेत. यातील नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या शोभा कोळी-शाह आणि महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर या दोन उमेदवारांत सरळ लढत झाली आहे.तर शिवसेना शिंदे गटाच्या रुपाली ठाकूर आणि अपक्ष नसरीन शेख हे दोन उमेदवार आपले नशीब अजमावणार आहेत.मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## रोह्यात ७१.९२% मतदान; उमेदवारांचे भवितव्य मतदानयंत्रात बंद

**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगरपरिषद सर्वाधिक निवडणुकीचे मतदान काही अपवाद सोडल्यास शांततेत पार पडले आहे. रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी एकुण ७१.९२ टक्के मतदान झाले आहे.

थेट नगराध्यक्षपदाचे राष्ट्रवादी ( अजित पवार गट ) वनश्री शेडगे व शिवसेना ( शिंदे गट )चे उमेदवार शिल्पा धोत्रे यांचे भवितव्य मतदाराने यंत्र पेटीत बंदिस्त झाले आहे. यासह नगरसेवकपदाचे १९ जागेसाठी ५० उमेदवारांचे भवितव्य यंत्र पेटीत बंदिस्त झाले आहे.

रोहा अष्टमीच्या नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी ( अजित



पवार गट ) व शिवसेना ( शिंदे गट ) यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. खा. सुनील तटकरे यांच्या बालेकिल्ल्यात शिवसेना ( शिंदे गट ) ने आव्हान दिल्यामुळे या निवडणुकीला महत्त्व आले आहे.

सकाळी साडेसात वाजता मतदाराला सुरुवात झाली. सकाळी थंडी असल्यामुळे सकाळच्या सत्रात मतदान संथगतीने सुरू झाले. सायंकाळी ५.३० पर्यंत एकुण मतदान ७१.९२ टक्के झाले आहे

रोहा शहरात खा.सुनील तटकरे, माजी आ.अनिकेत तटकरे यांनी जातीने लक्ष घालीत भेट देत राष्ट्रवादी पक्ष ( अजित पवार गट) च्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली व मतदानाची माहिती घेतली.आ अनिकेत तटकरे रोह्यात ठाण मांडून होते.

पोलीस उपविभागीय अधिकारी प्रसाद गोकुळे, पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी रोह्यात चोख बंदोबस्त राखला होता.

## महाड पालिका निवडणुकीत ७१.०३ टक्के मतदानाची नोंद

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आज झालेल्या मतदानामध्ये मतदारांनी उस्फुर्त असा प्रतिसाद देऊन मतदान केले. प्रभाग क्रमांक दोनच्या मतदान केंद्रावरील घटना वगळता इतर मतदान केंद्रावर मतदान शांततेत पार पडले. दरम्यान यावेळी ७१.०३% एवढे मतदान झाले.



आज सकाळी साडेसात वाजता महाड नगरपालिकेतील मतदानाला सुरुवात झाली. एक नगराध्यक्ष व २० नगरसेवक अशा दहा प्रभागांमधून हे मतदान घेण्यात आले. महाड नगरपालिकेत एकूण २३,१२४ मतदार आहेत. पैकी आज सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत झालेल्या एकूण मतदारांमध्ये पुरुष ८,१६६ तर स्त्री मतदार ८,२६० असे एकूण १६,४२६ मतदान झाले आहे. या मतदारांची टक्केवारी ही ७१.०३% एवढी आहे. २०१७ मधील निवडणुकीमध्ये महाड मध्ये ७३ टक्के एवढे मतदान झाले होते व त्यावेळी स्नेहल जगताप या थेट नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या होत्या तर त्यांच्याच काँग्रेस पक्षाची सत्ता आली होती. या वेळी मात्र त्या राष्ट्रवादी या पक्षाच्या घड्याळ या चिन्हावर निवडनुक लढवत आहेत आणि त्याची भाजपा सोबत युती आहे.

## कर्जतमध्ये ७० टक्के मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**कर्जत : प्रतिनिधी**

नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी सकाळपासूनच उत्साहात सुरुवात झाली. काही ठिकाणी मतदान यंत्रामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने थोडा गोंधळ झाला. या निवडणुकीत सुमारे सत्तर टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. काही ठिकाणी किरकोळ वादावादी वगळता मतदान शांततेत पार पडले.



आज सकाळी साडे सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. थंडी असूनही मतदारांनी काही मतदान केंद्रावर गर्दी केली होती. पहिल्या दोन तासात २९९५७ मतदारांपैकी ३३४६ मतदारांनी आपला हक्क बजावला. त्यामुळे ११ . १७ टक्के मतदान झाले. साडे अकरा वाजेपर्यंत ७७४१ मतदारांनी मतदान केले. त्यामुळे २५ . ८४ टक्के मतदान झाले. दीड वाजेपर्यंत १२ हजार ४८० मतदारांनी मतदान केल्याने टक्केवारी ४१ . ६६ वर गेली. साडे तीन वाजेपर्यंत १७ हजार १६६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची टक्केवारी झाली ५७ . १० टक्के. काही मतदान केंद्रावर उशिरा पर्यंत सुरु होते. सुमारे सत्तर टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

काही ठिकाणच्या मतदान केंद्रावर सकाळीच रांगा लागल्या होत्या. महिला व जेष्ठ नागरिकांसाठी वेगळ्या रांगा होत्या. प्रभाग दोन व तीन मतदान केंद्रावरील मधील मतदान यंत्रांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने काही वेळ मतदान करणे बंद पडले होते. प्रभाग तीन मधील चि. सौ. कां. वृषाली रंभाजी करणूक हिचा विवाह आज होता. तिने आपल्या वडिलांबरोबर येऊन प्रथम मतदानाचा हक्क बजावला आणि नंतर ती विवाह सोहळ्यासाठी रवाना झाली. पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मतदान सुरु असतानाच मतमोजणी २१ डिसेंबरला होणार असल्याचे वृत्त येताच उमेदवारांसह कार्यकर्ते सुद्धा नाराज झाले.

## माथेरानमध्ये मतदान प्रक्रिया शांततेत; ८५.३५% मतदान

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपरिषद निवडणूक २०२५ प्रक्रिया डिसें.२ रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत पूर्ण झाली.सगळ्या शासकीय यंत्रणांनीआणि पोलीस प्रशासन यांनी उत्तम प्रकारे सहकार्य करून मतदान प्रक्रिया शांततेत पूर्ण केली.संपूर्ण माथेरान मधील दहा प्रभागात मिळून जवळपास ८५% मतदान झाले.



माथेरान नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ही एकूण दहा प्रभागात झाली.यासाठी प्रशासनाकडून दहा मतदान केंद्र उभारण्यात आले होते.यावेळी सर्व प्रभागात मिळून अंदाजे ८५% मतदान झाले.ही सगळी मतदान प्रक्रिया पूर्ण करताना निवडणूक अधिकारी तथा अधीक्षक सुरेंद्र सिंह ठाकूर सहाय्यक निवडणूक अधिकारी राहुल इंगळे,निवडणूक नायब तहसिलदार कर्जत गोविंद कोढंबे यांच्या मार्गदर्शनाखाली सगळ्या टीमने त्याच बरोबर पोलीस प्रशासन यांनी देखील येथे चोख बंदोबस्त ठेवला होता.काही किरकोळ घटना येथे वगळता सगळी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. आज, दि.३ रोजी होणार मतमोजणी पुढे गेल्याने उमेदवार वर्गात काहीशी नाराजी दिसली

## श्रीवर्धनमध्ये ६६.२३ टक्के मतदान; तटकरे-गोगावले आमनेसामने!

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगरपरिषद निवडणुकीत आज नागरिकांनी लोकशाहीचा सुंदर उत्सव साजरा करत बारा हजार सहाशे सदतीस पैकी मोठ्या प्रमाणात मतदान केले. एकूण मतदान टक्केवारी ६६.२३% झाली दिवसभर शांत, शिस्तबद्ध आणि नियमानुसार प्रक्रिया पार पडली. श्रीवर्धनमधील ही निवडणूक फक्त नगरपरिषद मर्यादित राहिली नाही, तर दोन प्रमुख नेत्यांची प्रतिष्ठा पणाला



लागलेली असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष येथे वेधले गेले. एका बाजूला राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट) खासदार सुनील तटकरे,मंत्री आदितीताई तटकरे, आमदार आनिकेत तटकरे तर दुसऱ्या बाजूला शिवसेना (शिंदे गट) आमदार भरतशेठ गोगावले या दोन्ही बाजूंतून झालेल्या प्रचारयुद्धाने गाव ते शहर असा प्रत्येक कोपरा रंगला होता

## ९ डिसेंबर रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. ०९ डिसेंबर रोजी दुपारी १२.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.

या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे कोकण विभाग प्र.तहसिलदार (सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## मुरूड जंजिरा येथे ‘सखी बूथ’ची आकर्षक निर्मिती




**मुरुड: प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी नगर परिषद शाळा क्रमांक २ येथे विशेष ‘सखी बूथ’ उभारण्यात आले होते. या बूथची वैशिष्ट्ये म्हणजे संपूर्ण मतदान प्रक्रिया महिलांकडूनच सुरळीतरित्या पार पाडली. या बूथचे नेतृत्व केंद्राध्यक्ष श्रीमती संगीता खानावकर यांनी केले महिला सक्षमीकरणाचा उत्तम नमुना म्हणून हे केंद्र सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या संकल्पनेच्या मुळाशी निवडणूक निर्णय अधिकारी आदेश डफळ व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन बच्छाव यांची दूरदृष्टी असून, बूथच्या उभारणीपासून ते सजावटीपर्यंत सर्व टप्प्यांमध्ये त्यांनी मार्गदर्शन केले.

तसेच या सखी बूथाची निर्मिती आकर्षक, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, कर निर्धारण अधिकारी अनिकेत जगदाळे, नगर अभियंता अनिकेत वाझे, सुदेश माळी आणि अभिजीत चांदोरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या समन्वयातून बूथचे नियोजन, महिलांसाठी अनुकूल सुविधा, स्वागत कक्ष, गुलाबी थीमवरील सजावट, सेल्फी पॉईंट आणि स्वच्छ परिसर यांची उत्तम आखणी करण्यात आली आहे.

सदर बूथवर एकूण ६१३ मतदार असून महिलांना सुरक्षित, सुलभ आणि अल्हाददायक मतदान अनुभव देण्यासाठी सर्व व्यवस्था करण्यात आल्या होत्या. सखी बूथचे उद्दिष्ट केवळ महिलांच्या सहभागात वाढ करणे नसून, महिलांच्या नेतृत्वाखाली पारदर्शक, शांत, सुरक्षित आणि सौहार्दपूर्ण मतदानाची उभारणी करणे हे आहे.

पान १ वरुन

## महाडमध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये राडा

या वेळी शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जाबरे व त्यांच्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण केली, तर या वेळी आपल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप विकास गोगावले यांनी पत्रकारांशी बोलताना केला. आपल्यावर रोखण्यात आलेले रिव्हॉल्वर पोलिसांच्या ताब्यात दिल्याची माहितीही त्यांनी दिली, मात्र हे पिस्तुल एका सुरक्षा रक्षकाकडून हिसकावून घेऊन राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना गोगावले समर्थकांनी जबर मारहाण केल्याचा आरोप माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांनी केला आहे.

दरम्यान, हे वृत्त समजताच पोलिसांनी तातडीने परिसरात बंदोबस्त वाढवला असून रॅपिड अ‍ॅक्शन फोर्सची तुकडीही तैनात करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली व आवश्यक त्या सूचना केल्या.

## पराडे कॉर्नरजवळ स्कुटी अपघातात एकाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी रस्त्यावरील वावेघर ते पराडे वळणाजवळ जनक बळबहादुर भट (४०) हा त्याच्या ताब्यातील स्कुटी घेवून जात असताना वावेघर ते पराडे वळणाजवळ आला असताना कोणत्या तरी अज्ञात वाहनाने स्कुटीला ठोकर मारुन अपघात केला. सदर अपघातात जनक भट यांस गंभीर स्वरुपाची दुखापत होवून मयत झाला. याप्रकरणी रसायनी पोलिस ठाण्यात मंगळवार रात्री दिडच्या सुमारास अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणी रसायनी पोलिस ठाण्याचे एपिआय प्रमोद जाधव अधिक तपास करीत आहेत.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा २०२६चे वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या प्रशासकीय सेवेतील गट अ आणि गट ब संवर्गातील विविध रिक्त पदे भरती प्रक्रियेसाठी सन २०२६ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियोजित स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबईचे अवर सचिव र. प्र. ओतारी यांनी दिली आहे.

शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे दिनांक निश्चित करण्यात आले आहे. हे वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रसिध्द करण्यात आलेले हे वेळापत्रक अंदाजित वेळापत्रक असून, जाहिरातीच्या अथवा परीक्षेच्या प्रस्तावित महिना/दिनांकामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होवू शकतो. असा बदल झाल्यास तो आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

संबंधित परीक्षेचे परीक्षायोजना, अभ्यासक्रम, निवड पद्धत इत्यादी तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे आणि तो वेळोवेळी अद्यावत करण्यात येईल. संबधित परीक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येबाबतचा सविस्तर तपशील जाहिरात/अधिसुचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. वेळापत्रकातील सन २०२६ मधील दिनांक निश्चित नसलेल्या परीक्षांचे दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येतील.

**दुखवटा**

## चंद्रकांत तार्लेकर



**माणगाव:** नगरसेवक अजित तार्लेकर यांचे पिताश्री कै.चंद्रकांत तुकाराम तार्लेकर यांचे शनिवार दि. २९ नोव्हेंबर रोजी दुपारी २ :४५ वा. त्यांच्या राहते घरी बामणोली रोड,माणगाव येथे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय - ७८ वर्ष त्यांच्या पश्चात पाच मुले,एक मुलगी,सुना,जावई,नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी सोमवार दि.८ डिसेंबर रोजी माणगाव पोलीस ठाणे जवळ काळ नदीवर तर उत्तरकार्य गुरुवार दि.११ डिसेंबर रोजी राहते घरी बामणोली रोड,माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र अजित तार्लेकर यांनी सांगितले.

## संपादकीय

# उत्साही मतदान

निवडणूक आयोगाने आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर करण्याची तयारी केली होती. परंतु आता मतदानाचा कौल कोणाला हे २१ डिसेंबरला स्पष्ट होणार आहे. मंगळवारी पहिल्या टप्प्यात काही अपवाद वगळता राज्यभरात मतदान शांततेत पार पडले व ठिकठिकाणी मतदारांनी मोठ्या उत्साहाने मतदान केले. मतदारांचा हा उत्साह निश्चितच आशादायी म्हणावा लागेल.

**राज्यात प्रलंबित असलेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचे पहिल्या टप्प्यातील मतदान अखेर मंगळवारी पार पडले. यामध्ये एकूण २२६ नगरपरिषदा आणि ३८ नगरपंचायतींसाठींचे मतदान झाले. २४ नगरपालिका व विविध ७६ पालिकांमधील १५४ सदस्यपदाच्या निवडणुका निवडणूक आयोगाने स्थगित केल्या आहेत. येथे २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून २ डिसेंबर व २० डिसेंबर या दोन्ही टप्प्यांतील मतदान पार पडल्यानंतर सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींचा निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर केला जाईल असे आदेश उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले आहेत. खंडपीठाचा निकाल सगळ्यांना मान्य करावा लागेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. घोषित निवडणुका पुढे चालल्या आहेत, निकाल पुढे चालले आहेत, ही पद्धती योग्य वाटत नाही असे मतही त्यांनी व्यक्त केले. परंतु नागपूर खंडपीठ स्वायत्त आहे, निवडणूक आयोगही स्वायत्त आहे. त्यांचा निर्णय मान्य करावा लागेल. पण यातून जे उमेदवार आहेत, जे मेहनत करतात, प्रचार करतात, त्यांचा भ्रमनिरास होतो हे मुख्यमंत्र्यांचे उद्गार राज्यभरातील अनेकांची यासंदर्भातील भावनाच व्यक्त करतात. या सगळ्या प्रक्रियेत निवडणूक आयोगाने सुधारणा केली पाहिजे असेही त्यांनी म्हटले आहे आणि तसे बदल येत्या काळात घडून येतील अशी आशा करुया. बुधवारी निकाल जाहीर केल्यास २० तारखेच्या मतदानावर त्याचा परिणाम होऊ शकेल म्हणून निकालाची प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली आहे. विरोधी पक्षांनी मात्र या निर्णयांवरून सत्ताधाऱ्यांनाच टीकेचे लक्ष्य केले. निवडणुकीत महायुतीमधील पक्ष काही ठिकाणी आमनेसामने पहायला मिळाले. परंतु आपल्यात मतभेद असल्याचे मात्र वरिष्ठ नेत्यांनी फेटाळून लावले. भारतीय जनता पक्षाची ताकद वाढली म्हणून मित्रपक्षांना सोडून द्यायचे असे आम्ही होऊ देणार नाही असे फडणवीस यांनी म्हटले आहे हे लक्षात घ्यावे लागेल. एखाद्या निवडणुकीत काही गोष्टी घडल्या की लगेच मतभेद असे काही नसते. नगर परिषद, नगर पंचायत या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत. त्यामुळे सर्व प्रकारची समीकरणे या निवडणुकीत पहायला मिळाली असेही फडणवीस यांनी म्हटले आहे. परंतु हे समजून घेण्याची प्रगल्भता विरोधीपक्षांच्या नेत्यांमध्ये दिसत नाही. एकमेकांवर पैसे वाटपाचे आरोपही काही ठिकाणी करण्यात आले. हे आरोप चिंताजनक आहेत. काहींनी मात्र हे आरोप बालिशपणाचे असल्याचेही म्हटले आहे. काही ठिकाणी हाणामारीमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले. परंतु राज्यभरात बहुतांशी मतदान शांततेत पार पडले. अनेक ठिकाणी वेळ संपल्यानंतरही मतदारांच्या लांबच लांब रांगा दिसल्या. हे चित्र नक्कीच आशादायी आहे. वाढलेले मतदान कोणाला फायद्याचे ते निकालानंतर ठरेल. वर्षभराआधी झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकांमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असून महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांचा सुपडा साफ झाला होता. यानंतर पहिल्यांदाच राज्यात होणाऱ्या नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष आहे.**

# नवीन फौजदारी कायद्यांचे प्रदर्शनातील प्रात्याक्षिकाद्वारे ज्ञान..!



देशात १ जुलै २०२४पासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व भारतीय पुरावा कायदा हे तीन नवीन कायदे लागू झाले आहेत. या नवीन फौजदारी कायद्यांच्या पार्श्वभूमीवर, नागरिकांना गुन्हा घडल्यापासून अंतिम शिक्षा होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया समजावी, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात प्रात्यक्षिक विशेष आकर्षण ठरले. या प्रात्यक्षिक प्रदर्शनाने गुन्हा नोंदणीपासून शिक्षा आणि पुनर्वसनापर्यंतचा संपूर्ण न्यायप्रक्रियेचा प्रवास अत्यंत स्पष्ट, जिवंत आणि लोकशिक्षणात्मक स्वरूपात मांडला आहे. नवीन फौजदारी कायद्यांमुळे वैज्ञानिक तपास, तत्काळ प्रतिसाद, डिजिटल पुरावे, कठोर शिक्षा आणि पीडित केंद्रित न्याय या तत्त्वांना प्राधान्य मिळाले आहे. हे प्रदर्शन जनजागृतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे.

भारताच्या न्यायप्रशासनात ऐतिहासिक बदल घडवणाऱ्या नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित प्रात्यक्षिक प्रदर्शनाने नागरिक, विधिविद्यार्थी, पोलीस अधिकारी तसेच न्यायव्यवस्थेतील विविध घटकांना नव्या कायद्यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. न्यायसंस्थेच्या सर्व स्तरांवर पारदर्शकता, गतीमानता आणि नागरिकाभिमुखता वाढवण्याच्या दृष्टीने तयार करण्यात आलेल्या या नव्या कायद्यांचे तत्त्वज्ञान, अंगभूत प्रक्रिया आणि त्यांचा प्रत्यक्ष वापर या प्रदर्शनामधून प्रभावीपणे उलगडण्यात आला.

**नियंत्रण कक्षातूनच पीडितेला न्यायाची हमी**

नव्या कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया आणखी सोपी, डिजिटल आणि सर्वांसाठी उपलब्ध झाली आहे. प्रदर्शनात तयार केलेल्या नियंत्रण कक्षाच्या प्रतिकृतीमध्ये, नागरिकांकडून तक्रार स्वीकारणे, ऑनलाईन एफआयआर दाखल करणे, तक्रारदारास त्वरित स्वीकृती देत प्रतिसाद देण्याविषयी प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. पीडित मुलगी जेव्हा नियंत्रण कक्षाला कॉल करते, त्यावेळी नियंत्रण कक्षाचे कार्य जनतेसमोर येते. पिडीतेला घाबरू नको, आम्ही तुझ्या पाठीशी आहे. हे शब्दच दिलासा देतात आणि न्यायाची हमी मिळवून देतात. नवीन कायद्यांमध्ये पीडितांचे हक्क अधिक मजबूत करण्यावर भर असल्याने तक्रारदाराला तपासाच्या प्रत्येक टप्प्याची माहिती देण्याची सक्ती करण्यात आली आहे. प्रदर्शनातील या विभागात नागरिकांना पीडित हक्क, महिलांसाठी विशेष संरक्षण आणि पोलीस तपासाची गतीने हाललेली सूत्रे दाखविण्यात आली.

**तत्काळ, पारदर्शक आणि जबाबदार तपास**

प्रदर्शनातील पोलीस स्टेशन विभागात पोलिसांची भूमिकाच नव्या दृष्टीकोनातून मांडण्यात आली. नव्या फौजदारी संहितेनुसार पोलीस तपासाची वेळमर्यादा निश्चित करण्यात आली असून, तपासात अनावश्यक विलंब किंवा अधिकारांचा दुरुपयोग होऊ नये यासाठी कठोर नियम लागू केले आहेत. या विभागात सीसीटीव्हीयुक्त चौकशी कक्ष, महिलांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र सुविधा आणित्वरितपंचनामा करण्याची आधुनिक पद्धत प्रत्यक्ष दाखवण्यात आली. यामुळे तपासाची पारदर्शकता आणि विश्वसनीयता वाढवण्याचा उद्देश स्पष्टपणे नागरिकांसमोर आला.

**न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत पुराव्यांची अचूकता**

नवीन फौजदारी कायद्यांचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे वैज्ञानिक पुराव्यांना प्राधान्य देणे आहे. साक्षी पुराव्यांवरील अवलंबित्व कमी करून न्यायवैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याचा प्रयत्न नव्या कायद्यांतून दिसून येतो. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या प्रयोगशाळा विभागात बोटांचे ठसे ओळखण्याची आधुनिक तंत्रज्ञान, रक्त, विष, केस, ऊतकांचे नमुने तपासण्याची प्रक्रिया, डीएनए प्रोफाइलिंग, डिजिटल फॉरेन्सिक मोबाईल, लॅपटॉप, सीसीटीव्ही फुटेज विश्लेषणामध्ये नवीन फौजदार कायद्यांमुळे आलेली गतिशिलता दाखविण्यात आली. सात वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा झाली असल्यास अशा गुन्ह्यांमध्ये नवीन कायद्यांनुसार न्याय सहायक प्रयोगशाळेद्वारे पुरावे गोळा करण्याची सक्ती आहे. त्यानुसार मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स उपलब्ध करून देण्यात येत आहे. न्यायालयीन प्रक्रियेत विलंब टाळण्यासाठी तपास अधिकाऱ्यांना वैज्ञानिक पुरावे अनिवार्य करण्याबाबत नव्या कायद्यांनी स्पष्ट मार्गदर्शन केले आहे.

**वैद्यकीय सहाय्य व विषशास्त्र विभागात पीडितांच्या न्यायाची प्रक्रिया वेगात**

गुन्हा घडल्यानंतर पीडितांना वेगाने न्याय मिळवून देण्यासाठी ही न्यायप्रक्रियेची अत्यंत आवश्यक पायरी आहे. नव्या कायद्यांनुसार अत्याचारग्रस्त, जखमी व्यक्ती, लैंगिक अत्याचार पिडीत यांच्या वैद्यकीय तपासणीबाबत अधिक स्पष्ट, संवेदनशील आणि कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रदर्शनातील या विभागात वैद्यकीय तपासणीची नव्या मानकांनुसार प्रक्रिया, अहवालांची कालमर्यादा, डॉक्टरांची जबाबदारी आणि नमुन्यांची शृंखला यांचे उत्कृष्ट स्पष्टीकरण दिले आहे. ऑनलाईन पद्धतीने नमुन्यांचे अहवाल संबंधित पोलीस स्टेशनला पाठविण्यात येत असल्यामुळे न्यायप्रक्रियेत गतीमानता आली असल्याचा सकारात्मक बदल प्रदर्शनातून दिसून येत आहे.

**अभियोग संचालनालयात तपास ते न्यायालयीन लढाईपर्यंतचा समन्वय**

नवीन कायद्यात गुन्ह्याच्या तपासानंतर पोलिसांनी सादर केलेल्या अहवालाचे परीक्षण करण्यासोबतच, न्यायालयीन प्रक्रियेत दोषारोप सिद्ध करण्यासाठी आवश्यक पुराव्यांची शाश्वती तपासणे ही अभियोजनाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचे दिसून येते. याविभागात आरोपींवर कोणत्या कलमांनुसार गुन्हा दाखल करता येईल. याबाबत मार्गदर्शन, पुराव्यांची मांडणी, साक्षीदार व्यवस्थापन, पीडितांचे प्रतिनिधित्व, न्यायालयीन दस्तऐवजांची तयारी या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण नव्या कायद्यांतील तरतुदींद्वारे नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

**गतीमान न्याय आणि पारदर्शक कार्यपद्धती**

नव्या फौजदारी कायद्यानुसार न्यायालयीन प्रक्रियेतील अनावश्यक विलंब कमी करण्यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. दिवाणी न्यायालयात गुन्हेविषयी साक्षीदाराची ऑनलाइन साक्ष देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, वेळमर्यादा असलेली सुनावणी, पीडितांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन, डिजिटल चार्जशीट, डिजिटल पुरावे या सर्व बाबींची नवीन फौजदारी कायद्यांच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली. गुन्हा घडला ते अंतिम शिक्षा या संपूर्ण प्रक्रियेची साखळी नागरिकांना साध्या आणि समजण्यास सोप्या पद्धतीने प्रात्याक्षिकाद्वारे मांडण्यात आली. तारीख पे तारीख टाळण्यासाठी नवीन कायद्यांतील तरतुदींचा उहापोह करण्यात आला.

**नव्या कायद्यांद्वारे आरोपींसाठी योग्य दंड व्यवस्थापन**

नवीन फौजदारी कायद्यातील कलमानुसार शिक्षेची माहिती होय. दिवाणी न्यायालयाने ठोठाविलेल्या शिक्षेला मा. उच्च न्यायालयात होत असलेली सुनावणी प्रात्याक्षिकाद्वारे दाखवित हुबेहुब न्यायालयातील प्रसंग उभा करण्यात आला. पारंपरिक शिक्षेच्या पद्धतीत काही बदल करून, समाजहित, पुनर्वसन आणि दंडाची प्रभावीता वाढवण्याकडे कायदा अधिक झुकत असल्याचे या विभागातून स्पष्ट केले गेले. कायदे अधिक स्पष्ट, काटेकोर आणि गुन्ह्यांच्या स्वरूपानुसार वर्गीकृत असल्याने तपास, अभियोजन आणि न्यायालयीन निर्णय सुलभ झाले आहेत.

**प्रदर्शनात प्रश्नावलीच्या माध्यमातूनही कायद्याचे ज्ञान**

नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित हे प्रात्यक्षिक प्रदर्शन केवळ कायद्यांची माहिती देणारे नव्हते, तर भारतातील न्यायव्यवस्थेतील परिवर्तनाची सशक्त झलक होते. गुन्हा नोंदवण्यापासून अंतिम निकालापर्यंतची प्रक्रिया अधिक तांत्रिक, पारदर्शक, जलद आणि नागरिकमैत्री बनवण्याचा उद्देश स्पष्टपणे सर्वांसमोर आला. नव्या कायद्यांची मांडणी, तंत्रज्ञानाचा उपयोग, वैज्ञानिक तपासाला दिलेले प्राधान्य, पीडितांचे हक्क आणि न्यायप्रक्रियेतील गतीमानता या सर्व माध्यमांतून भारताची न्यायव्यवस्था अधिक सक्षम, संवेदनशील आणि आधुनिक होत असल्याचा संदेश या प्रदर्शनाने परिणामकारकपणे दिला. प्रदर्शनामध्ये विविध कलमांच्या माहितीचे पोस्टर्स आकर्षक रंगसंगतीने दाखविण्यात आले आहे.

(साभार: महासंवाद)



## बदलते तंत्रज्ञान

### जीमेलची 'ही' फीचर्स अतिशय महत्त्वाची

नोकरीसाठी अर्ज करणे, ऑफिसमधील कामे, एखाद्या दुकानदारला ई-मेलद्वारे फोटो पाठवून झेरॉक्स काढणे, जास्त एमबी असलेले फोटो इतरांना शेअर करणे आदी अनेक गोष्टींसाठी अनेकदा जीमेलचा वापर करण्यात येतो. आज आपण जीमेलच्या काही फीचर्सबद्दलची माहिती घेणार आहोत.



१. ई-मेल अनसेंड करणे : तुम्ही चुकीच्या ई-मेलवर मेसेज पाठवला असेल? किंवा पाठवलेल्या ई-मेलमध्ये काही चुका असतील, तर चिंता करण्याची गरज नाही, कारण जीमेलमध्ये एक खास फीचर आहे. त्यासाठी जनरल सेटिंग्ज मेन्यूमध्ये जा. तिथे 'इनेबल अनडू सेंड' हा पर्याय निवडल्यानंतर तुम्हाला एक लहान Cancellation विंडो दिसेल. ती इनेबल केल्यावर ई-मेल कॅन्सल किंवा अनडू करण्यासाठी ५, १०, २० किंवा ३० सेकंदाचा कालावधी देण्यात येईल.


२. ई-मेलमध्ये एखाद्याला तात्पुरता प्रवेश देणे : तुम्ही सुटीवर गेले असताना तुमचा ई-मेल इनबॉक्स सांभाळण्यासाठी सहकाऱ्याला पासवर्ड न देता सुरक्षितपणे तात्पुरता सांभाळायला देऊ शकता. त्यासाठी तुमच्या जीमेलच्या सेटिंगमध्ये जा. त्यानंतर 'ग्रॅण्ट अ‍ॅक्सेस टू युअर अकाउंट'च्या खाली तुमचा ई-मेल अ‍ॅड्रेस टाका. परत याल तेव्हा सहायक यांना काढून टाका.

३. जीमेलद्वारे शब्दलेखन तपासा : एखादा मेसेज लिहिताना चुका होणे साहजिक आहे, पण या चुका टाळण्यासाठीसुद्धा जीमेल तुम्हाला मदत करेल. तुम्ही एखाद्या व्यक्तीस ई-मेल पाठवण्याअगोदर उजव्या कोपऱ्यातून तीन डॉट असणाऱ्या मेनू आयकॉनवर क्लिक करा. त्यानंतर 'स्पेलिंग तपासा'वर क्लिक करा. जीमेल तुमचा ई-मेल आपोआप स्कॅन करील आणि त्यात आढळणाऱ्या शुद्धलेखनाच्या कोणत्याही चुका हायलाईट करील जेणेकरून तुम्ही त्या लगेच सुधारू शकता.

४. जीमेल ऑफलाईन वापरा : इंटरनेट कनेक्शन नसतानाही इनबॉक्समध्ये प्रवेश करता यावा यासाठी जीमेलचा ऑफलाइन मोड अ‍ॅक्सेस करा. ऑफलाइन सेटिंग्ज टॅब अंतर्गत ऑफलाइन मोड ऑन करा.

५. ऑटो रीस्पॉन्डर सेट करा : कोणतेही ऑफिसचे कोणतेही काम न करता तुम्हाला कुटुंबातील एखाद्या कार्यक्रमाचा आनंद लुटायचा असेल, तर जीमेलमध्ये खाली व्हेकेशन प्रतिरीस्पॉण्डर विभाग स्क्रोल करा आणि तो चालू करा.

# भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद



## निमित्त

डॉ. राजेंद्र प्रसाद हे स्वतंत्र भारताचे पहिल्या राष्ट्रपती होते. बिहारच्या एक साधारण गावातून 'भारतरत्न' या देशाच्या सर्वोच्च नागरिक सन्मानाची प्राप्ती केलेले हे व्यक्तिमत्व होते. ते सलग १२ वर्षे राष्ट्रपतिपदावर आरूढ झालेले भारताचे पहिले राष्ट्रपती होते. खरोखरच ते अजातशत्रू होते. त्यांचे संपूर्ण नाव डॉ. राजेंद्र प्रसाद महादेव सहाय असे होते, डॉ. राजेंद्र प्रसाद या नावानेच ते सर्वत्र ओळखले जातात.


बिहारच्या सारन जिल्ह्यातील जिरादेई या लहानशा खेड्यात श्रीवास्तव या कुटुंबात ३ डिसेंबर १८८४ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा चौधुरलाल हे हथवा संस्थानचे दिवाण होते, तर वडील महादेव सहाय हे जमीनदार होते. ते संस्कृत व फारसी भाषेचे तज्ज्ञ होते तसेच आर्य व युनानी या दोन्ही पद्धतीची वैद्यकी करीत असत. राजेंद्र प्रसादांची आई कमलेश्वरीदेवी ही आर्य संस्कृती व जुन्या परंपरेतील सात्त्विक व धार्मिक वृत्तीची स्त्री होती. ती राजेंद्र प्रसादांना त्यांच्या लहानपणी रामायण महाभारतातील कथा सांगत असे. विशेषतः रामकथेचा राजेंद्र प्रसादांच्या मनावर विशेष परिणाम झाला होता. राजेद्रप्रसादांच्या आईचे निधन झाल्यावर त्यांचा सांभाळ त्यांच्या मोठ्या बहिणीने केला आणि वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे पालनपोषण व शिक्षण त्यांचे मोठे काका (चुलते) महेंद्र प्रसाद यांनी केले. मार्गदर्शन थोरले भाऊ महेंद्रबाबू यांनी केले.

डॉ. राजेंद्र प्रसादांच्या गावात एकही प्राथमिक शाळा नव्हती. त्यामुळे त्यांना शिकवण्यासाठी एका मुसलमान मौलवीची नेमणूक करण्यात आली. बालपणी घरातच शिक्षणाला सुरुवात झाली. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर राजेंद्रबाबूंना छपरा येथील शाळेत इंग्रजी शिकण्याासाठी धाडण्यात आले. १९०२मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले, तेव्हा त्यांचे वय १७ वर्षांचे होते. उच्च शिक्षणासाठी कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात त्यांनी प्रवेश घेतला आणि ते बीएची परीक्षा उत्तीर्ण झाले. कलकत्ता विद्यापीठातून एमएची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १९०८मध्ये त्यांनी मुझफ्फरपूरच्या ब्राह्मण कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापनकार्य केले. परंतु त्यांचे अध्यापनात फारसे मन रमले नाही. त्यामुळे त्यांनी वकील होण्याचे ठरविले. १९१५ साली ते मास्टर ऑफ लॉज ही परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. पुढील दोन वर्षांत त्यांनी डॉक्टर ऑफ लॉज ही कायद्याची सर्वोच्च पदवी मिळवली. त्यामुळे त्या दिवसापासून ते कायमचे 'डॉ. राजेंद्रप्रसाद' झाले.

१९२४मध्ये डॉ. राजेंद्रबाबूंची पाटणा महापालिकेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. राजेंद्रबाबूंची त्या काळची कमाई सालीना तीस ते चाळीस हजारांवर होती, पण देशसेवेसाठी त्यांनी वकिली सोडली आणि आजन्म फकिरी पत्करली. स्वातंत्र्य चळवळीतील लाला लजपतराय, अरविंद्र घोष आणि मदनमोहन मालवीयांसारख्या नेत्यांच्या विचाराने ते प्रभावित झाले. पुढे एखाद्या लोहचुंबकासारखे राजेंद्रबाबू गांधीजीकडे आकर्षिले गेले. १९४२च्या 'छोडो भारत' आंदोलनात त्यांनी तुरुंगवास भोगला.

राजेंद्रप्रसाद यांना देशाचे हंगामी राष्ट्रपती म्हणून निवडण्यात आले. सलग १२ वर्षे राष्ट्रपतिपदावर विराजमान झालेले ते आतापर्यंतचे एकमेव राष्ट्रपती म्हणावे लागतील. २८ फेब्रुवारी १९६३ रोजी रात्री सव्वादहा वाजता त्यांनी या जगाचा निरोप घेतला. (साभार : इंटरनेट )

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### युरिक अ‍ॅसिडचे प्रमाण वाढल्यास खा 'ही' फळे

आपल्या शरीरात युरिक अ‍ॅसिडचे प्रमाण वाढल्यामुळे त्याचा आपल्या शरीरावर गंभीर परिणाम होतो. मग काहींचे सांधे जड होतात, त्यांचे हात पाय दुखतात, तर काहींच्या पायाला सूज येते, त्यांना थकवा येतो किंवा त्यांच्या टाचा दुखतात. अशा समस्यांपासून आराम मिळवायचा असेल तर फळे खाणे खूप गरजेचे आहे. हिवाळ्यात युरिक सिडवर कंट्रोलमध्ये आणायचे असल्यास फळे खाणे खूप गरजेचे आहे. आता ही फळे कोणती याबाबत जाणून घेणार आहोत.



संत्री : संत्री खाल्ल्यामुळे आपल्या शरीरात युरिक अ‍ॅसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होते. संत्रामध्ये व्हिटॅमिन सी असते. त्यामुळे ते आपल्या किडनीचे आरोग्य सुधारते तसेच युरिक अ‍ॅसिडची पातळीदेखील नियंत्रित करते. संत्री खाल्ल्यामुळे सांधेदुखीपासूनदेखील आराम मिळतो. सोबतच युरिक अ‍ॅसिड वाढल्यानंतर टाच दुखत असेल तर संत्री खा. यामुळे तुमची टाच दुखीदेखील कमी होण्यास मदत होईल.

किवी : जर तुमच्या शरीरात युरिक अ‍ॅसिडचे प्रमाण जास्त असेल, तर तुम्ही किवी जरूर खा. किवीमध्ये अनेक पौष्टिक घटक असतात, जे युरिक अ‍ॅसिडचे प्रमाण नियंत्रणात आणण्यास मदत करतात. किवीमध्ये पोटॅशियम, व्हिटॅमिन सी, फोलेट, व्हिटॅमिन ई असते, जे युरिक अ‍ॅसिड नियंत्रणात आणण्यास मदत करते.

स्ट्रॉबेरी : स्ट्रॉबेरी युरिक अ‍ॅसिड नियंत्रणात आणण्यासाठी मदत करते. स्ट्रॉबेरीमध्येदेखील व्हिटॅमिन सी असते ज्यामुळे आपल्याला सांधेदुखीपासून आराम मिळतो. स्ट्रॉबेरीमध्ये फायबर, कॅल्शियम, व्हिटॅमिन सी, मॅग्नेशियम असे पोषक घटक असतात, जे आपले शरीर निरोगी ठेवतात आणि यूरिक अ‍ॅसिड नियंत्रणात आणण्यासाठी मदत करतात. यासाठी तुम्ही स्ट्रॉबेरीचा रसदेखील घेऊ शकता.

अननस : अननस हादेखील युरिक अ‍ॅसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत करतो. अननसामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे फायबर प्युरीन पचवण्यास मदत करते. जर तुम्हाला युरिक अ‍ॅसिडचा त्रास होत असेल, तर अननसाचे सेवन जरूर करा. त्यामुळे तुमची युरिक अ‍ॅसिडची पातळी नियंत्रणात आणण्यास मदत होईल.

# मुरुडमध्ये ७३.८९ टक्के मतदान; निकालाची प्रतीक्षा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५करिता आज मतदानाला सकाळपासून सुरुवात झाली एकुण ७३.८९ टक्के मतदान झाले . नोकरी निमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या औरंबागवाद,पुणे मुंबई येथून सुद्धा मतदार आल्याने मतदानाची टक्केवारी वाढली आहे.थेट नगराध्यक्षासाठी ३ उमेदवार तर २० नगरसेवकांसाठी ५८ उमेदवार निवडणूकीत आपले नशीब अजमणार आहेत.

आज सकाळी ७.३० वाजल्यापासून मतदानला सुरुवात झाली यावेळी सुरूवातीला संथ प्रतिसाद मिळाला. मात्र, त्यानंतर सकाळी ८ ते ९ वाजल्यानंतर वेग वाढला. दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत गर्दी कायम होती. परंतु, त्यानंतर मतदानाची गर्दी कमी झाली.महिलांसह पुरुषांनी मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर रांगेत उभे राहून लोकाशाहीचा हक्क बजावला एक उत्साह दिसून येत होता.



मतदारांची ने–आण करण्यासाठी उमेदवारांनी रिक्षा, चारचाकी वाहनांची काही भागात व्यवस्था केली होती. उमेदवारांचे बूथ एजंटही सक्रिय होते. प्रशासनन कडुन मतदारांना व्होटर स्लीप ,मेडिसन देण्यासंबंधी देखील व्यवस्था बूथमध्ये करण्यात आली होती. उमेदवारांनी आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदारांशी संवाद साधला. सकाळी मतदानाची टक्केवारीदेखील वेगात वाढली. सकाळी ११ पर्यंत मतदानाची टक्केवारी चांगली होती.दुपारी मात्र मतदान केंद्रांत फारशी गर्दी नव्हती. दुपारी चारनंतर पुन्हा मतदानासाठी मतदान केंद्रांत गर्दी झाली. सायंकाळी पाचपर्यंत काही मतदान केंद्रांत मोठी गर्दी मतदानासाठी झाली.

मतमोजणी तारीख पुढे गेल्याने उमेदवारांची धाकधूक वाढली असून या संदर्भात सर्व उमेदवारांनी नाराजी दर्शवली आहे. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत १७ केंद्रावर एकुण मतदान ६४.६० टक्के एकुण मतदान ७४५८ या मध्ये स्त्री ३९६४ पुरुष ३४९४ मतदान झालेआहे. दुपारच्या भोजनानंतर मोठ्याच मोठ्या गर्दी झाली सायंकाळी पाच पर्यंत ७३.८९ टक्के मतदान झाले.

# तुरळक घटना वगळता खोपोलीत शांततापूर्ण वातावरणात सरासरी ७८ टक्के मतदान

**खोपोली : प्रतिनिधी**

लहान सहान घटना वगळता खोपोलीत सर्व १५ प्रभागात शांततेत मतदान पार पडले. सरसरी ७८ टक्के मतदान झाल्याचा अंदाज.

मतमोजणी लांबल्याने उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. दरम्यान, आपापल्या उमेदवार व कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी परिवर्तन विकास आघाडी कडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ सुनील पाटील , नेते सुधाकर घारे , महायुतीचे उमेदवार कुलदीपक शेंडे व आमदार महेंद्र थोरवे, भाजप नेते व आमदार प्रशांत ठाकूर यांनीही सर्व मतदान केंद्रावरील बुथला भेटी दिल्या .

संध्याकाळी सहा वाजता मिळालेल्या माहितीनुसार संपूर्ण शहरातील सर्व मतदान केंद्र मिळून सरासरी ७८ टक्के मतदान झाले असल्याचे समजते आहे .आत्ता कोर्टाचा आदेशानुसार ०३ डिसेंबर ऐवजी येत्या २१ डिसेंबर ला मतमोजणी होणार असल्याने सर्व उमेदवारांचा जीव टांगणीला लागणार आहे.



रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

**भारत का राजपत्र**

**The Gazette of India**

सी.जी.-एम.एच.-अ.-27112025-268000
CG-MH-E-27112025-268000

असाधारण
EXTRAORDINARY

भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 5105] नई दिल्ली, मंगलवार, नवम्बर 18, 2025/कार्तिक 27, 1947
No. 5105] NEW DELHI, TUESDAY, NOVEMBER 18, 2025/KARTIKA 20, 1947

रेल मंत्रालय

(मध्य रेलवे)

शुद्धिपत्र

(ई-गजट अधिसूचना संख्या 4319 दिनांक 30/09/2025 के संबंध में, नीचे उल्लिखित अनुच्छेद को पिछली अधिसूचना में सही विवरण के रूप में माना जायेगा)

मुंबई, 14 नवंबर, 2025

रेलवे (संशोधन) अधिनियम 2008 की धारा 20A के तहत

## शुध्दीपत्रक

मौजे पोयंजे, ता. पनवेल येथील जमिन पनवेल-चौक रेल्वे लाईन दुहेरीकरण (Multitracking of Panvel - Chouk) व पनवेल कॉर्ड (Panvel Chord) करीता भूसंपादनाची कार्यवाही उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) रायगड अलिबाग कार्यालयामार्फत सुरू असून रेल्वे (सुधारीत) अधिनियम २००८ चे कलम २०A ची अधिसूचना भारत राजपत्रात नं. ४३१९ सी.जी.-एम.एच.-अ.-०८१०२०२५-२६६७५७, दि. ३०/०९/२०२५ अन्वये प्रसिध्द झाली असून सदर अधिसूचनेतील मौजे पोयंजे, ता. पनवेल येथील सर्व्हे क्रमांक वगळण्यात येत असून मौजे पोयंजे, ता. पनवेल येथील खालील अनुसूची प्रमाणे नवीन सर्व्हे क्रमांकाच्या जमिनी संपादन होत असल्याने प्रकरणी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी यापुढे मौजे- पोयंजे , ता. पनवेल करीता खालील अनुसूची प्रमाणे वाचण्यात यावे.

**सहाय्यक कार्यकारी अभियंता पनवेल, मध्य रेल्वे मुंबई च्या अंतर्गत पनवेल - चौक रेल्वे लाईनचे दुहेरीकरण (Multitracking of Panvel - Chouk) व पनवेल कॉर्ड (Panvel Chord) या प्रकल्पाकरीता अधिग्रहित करण्याच्या जागेचे संक्षिप्त वर्णन**

अनुसुची

अधिग्रहित करावयचा तपशिल

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | 7/12 नुसार भूधारकाचे नाव | सर्व्हे नं. | 7/12 नुसार एकूण क्षेत्र (हे.आर) | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पोयंजे | पनवेल | एल. आर. व्यंकटरमण | ६७/१ | ०.०७.०० | ०.१११ |
| | | | वसंत धुंडीराज जोशी | ६७/२ | ३.२५.५० | |
| | | | मध्य रेल्वे पनवेल कर्जत उपगनरीय रेल्वेमार्ग | | | |
| | | | ता.ग.घे. वामन केशव जोशी | | | |
| | | | शिवराम बाळशेट काळण | | | |
| | | | जिजाबाई काशिनाथ बताळे | ६७/३/अ | ०.०५.०० | |
| | | | वसंत धुंडीराज जोशी | ६७/३/ब | ०.१६.०० | |
| | | | सुवर्ण सुरेश भोपी | ६७/४ | ०.०२.५० | |
| | | | संतोष नामदेव कडव | | | |
| | | | स्नेहा संजय भंडारी | | | |
| | | | प्राजक्ता पांडुरंग गायकर | | | |
| | | | शारदा भागा कडव | | | |
| | | | सचिन भागा कडव | | | |
| | | | सुवर्णा भागा कडव | | | |
| | | | संजय भागा कडव | | | |
| | | | वसंत धुंडीराज जोशी | ६७/५/अ/१ | १.३६.८० | |
| | | | पनवेल कर्जत रेल्वे मार्ग | ६७/५/अ/२ | ०.४०.२० | |
| | | | सिकाल लॉजिस्टिक लि. | ६७/५/ब | ०.१०.०० | |
| | | | सिताराम भाऊ ठोंबरे | ६७/६ | ०.०१.०० | |
| | | | कमळाकर बळीराम सोनटक्के | ८१/१/१ | २.३९.०० | ०.१०१ |
| | | | प्रभाकर बळीराम सोनटक्के | | | |
| | | | पेन्ना सिमेंट इंडस्ट्रीज लिमिटेड | | | |
| | | | मध्य रेल्वे पनवेल कर्जत उपगनरीय रेल्वेमार्ग | | | |
| | | | अनिल अनंत सोनटक्के | | | |
| | | | अमुल अनंत सोनटक्के | | | |
| | | | संजय अनंत सोनटक्के | | | |
| | | | सुनिल अनंत सोनटक्के | | | |
| | | | पनवेल कर्जत रेल्वे मार्ग | ८१/१/२ | ०.१३.२० | |
| | | | नरेश बाबूलाल मिराणी | ८१/२ | ०.४०.०० | |
| | | | जयेश बाबूलाल मिराणी | | | |
| | | | जयश्री जयंतीलाल ठक्कर | | | |
| | | | सूधा बाबूलाल मिराणी | | | |
| | | | वर्षा घनश्यामदास ठक्कर | | | |
| | | | मध्य रेल्वे पनवेल कर्जत उपगनरीय रेल्वेमार्ग | | | |
| | | | मध्य रेल्वे पनवेल कर्जत उपगनरीय रेल्वेमार्ग | ८२ | ०.९५.९० | ०.०८०२ |
| | | | अनिल अनंत सोनटक्के | | | |
| | | | अमुल अनंत सोनटक्के | | | |
| | | | संजय अनंत सोनटक्के | | | |
| | | | सुनिल अनंत सोनटक्के | | | |
| | | | प्रकाश वासुदेव देवधर | ८३/१ | ०.२२.०० | ०.०७ |
| | | | अनंत बळीराम सोनटक्के | ८३/२ | ०.०३.०० | |
| | | | यशवंत आत्माराम सोनटक्के | | | |
| | | | वसंत आत्माराम सोनटक्के | | | |
| | | | कमळाकर बळीराम सोनटक्के | | | |
| | | | प्रभाकर बळीराम सोनटक्के | | | |
| | | | विलास दत्तात्रेय सोनटक्के | | | |
| | | | सुभाष दत्तात्रेय सोनटक्के | | | |
| | | | विकास दत्तात्रेय सोनटक्के | | | |
| | | | सुवर्णा विजय कोंडलेकर | | | |
| | | | अस्मिता अनिल पाठारी | | | |
| | | | निशिगंधा निलेश ठकेकर | | | |
| | | | रेखा रमेश सोनटक्के | | | |
| | | | अविनाश रमेश सोनटक्के | | | |
| | | | निहीरा निलेश कोंडलेकर | | | |
| | | | सुवर्ण सुरेश भोपी | ८८/१ | ०.१७२० | ०.०६८ |
| | | | संतोष नामदेव कडव | | | |
| | | | स्नेहा संजय भंडारी | | | |
| | | | प्राजक्ता पांडुरंग गायकर | | | |
| | | | मध्य रेल्वे पनवेल कर्जत उपगनरीय रेल्वेमार्ग | | | |
| | | | मध्य रेल्वे पनवेल कर्जत उपगनरीय रेल्वेमार्ग | ८८/२ | ०.०४.३० | |
| | | | सुवर्ण सुरेश भोपी | ८८/३ | १.११.३० | |
| | | | संतोष नामदेव कडव | | | |
| | | | स्नेहा संजय भंडारी | | | |
| | | | प्राजक्ता पांडुरंग गायकर | | | |
| | | | शारदा भागा कडव | | | |
| | | | सचिन भागा कडव | | | |
| | | | सुवर्णा भागा कडव | | | |
| | | | संजय भागा कडव | | | |
| | | | प्रकाश वासुदेव देवधर | ८९ | ०.६३.०० | ०.००८ |
| | | | भारत सरकार मध्य रेल्वे | ८९/अ/२ | ०.११.०० | |
| | | | पेन्ना सिमेंट इंडस्ट्रीज लिमिटेड | ९५/१ | ०.२२.८० | ०.०३४ |
| | | | पी. प्रताप. रेड्डी | ९५/२ | ०.३८.६० | |
| | | | काशिनाथ देहू चोरघे | ९५/३ | ०.१०.९० | |
| | | | देवेंद्र काशिनाथ चोरघे | | | |
| | | | गोविंद देहू चोरघे | | | |
| | | | पी. प्रताप. रेड्डी | ९७/१ | ०.४१.८० | ०.१६ |
| | | | भारत सरकार मध्य रेल्वे | ९७/२ | ०.०९.५० | |
| | | | शोभना उर्फ सारीका सुधाकर शेटे | ९८ | ०.३२.४० | ०.०८५ |
| | | | बाळाराम लक्ष्मण म्हात्रे | १४५/१ | ०.०१.२० | ०.०१७ |
| | | | सुलोचना रामचंद्र पाटील | | | |
| | | | भारत सरकार मध्य रेल्वे | १४५/२ | ०.१८.०० | |
| | | | मे. मॅरेथॉन पनवेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १४१ | ०.४४.०० | ०.१२७ |
| | | | | | **एकूण आवश्यक क्षेत्र** | 0.8596 |

[फा. सं. G197/panvel-chouk/Panvel Chord/Corrigendum/20A]

सही/–
अवनीश कुमार पांडे,
मुख्य प्रशासकिय अधिकारी (निर्माण)

दिनांक : ०१/१२/२०२५
क्र. उजि (भू) राअ/कार्या–१/पनवेल–चौक रेल्वे लाईन दुहेरीकरण/२०२५

# मसाजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय

## गुन्हे शाखेतील पोलिसांची कारवाई; सहा महिलांची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायातून सहा महिलांची गुन्हे शाखा पोलिसांनी सुटका केली आहे.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरपणाच सलुन आणि स्पा शॉप नंबर ०१, देवीज्योती हॉटेलचे जवळ, जुहूनगर, जुहूगाव, सेक्टर ११, वाशी, नवी मुंबई येथे ६००० रूपये घेवुन मसाजच्या नावाने तेथे असलेल्या महिलांकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत आहेत.



वपोनि घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास आरपणाच सलुन आणि स्पा येथे पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी सहा महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. स्पाची महिला मॅनेजर असिमा रॉबिन घोष (वय ३४, रा. रूम नंबर ०३, साईकुंज सोसायटी, सेक्टर ११, वाशी, नवी मुंबई, मूळ रा. कोलकत्ता) व तिचा पार्टनर पाहिजे आरोपी नर आलम शेख (रा. चेंबुर) यांनी आपआपसात संगनमत करून सहा महिलांना बॉडी मसाज करण्याचे नावाने प्राप्त केल्या. त्या महिलांना वेश्या व्यवसायासाठी बनावट ग्राहकास दाखवून व्यवसायाचा मोबदला म्हणून ६००० रूपये स्विकारले.

महिला आरोपी व पाहिजे आरोपी यांचे विरूध्द वाशी पोलीस ठाणे येथे गु. रजि.नं. ६२७/२०२५, भा.न्या.सं. कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३, ४, ५, ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्हयातील अटक महिला आरोपीची ४/१२/२०२५ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे. गुन्हयाचा तपास वाशी पोलीस ठाणे करत आहे. सदरची कारवाई सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पृथ्वीराज घोरपडे, सपोनि योगेश देशमुख, पोउपनिरी सरिता गुडे, पोहवा मांडोळे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण, पोशि पारासुर, पोशि चव्हाण, पोहवा अडकमोल, पोना अनिता भोये तसेच चालक पोहवा मोहिते यांनी केली आहे.

# उरणमध्ये एड्स जनजागृती कार्यशाळा

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभाग आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली. हा कार्यक्रम कार्यवाह प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य गजानन चव्हाण होते, तर जेएनपीए हॉस्पिटलच्या डॉ. वर्षा यादव या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच आरोग्य सेवा कर्मचारी उज्वला निकाळजे, सुषमा म्हात्रे आणि पूजा गावंड उपस्थित होते. आरोग्य सेविका उज्वला निकाळजे यांनी एड्सविषयक मूलभूत माहिती, प्रतिबंध आणि जनजागृतीचे महत्त्व यावर प्रबोधनपर व्याख्यान दिले. डॉ. वर्षा यादव यांनी विद्यार्थ्यांची जागरूकता वाढवून समाजातील एड्ससंबंधित गैरसमज व कलंक दूर करण्याची गरज यावर भर दिला. एड्स मुळे होणारे मानवी श्रमशक्तीचे नुकसान व आरोग्य सेवेवरील ताण तणाव याची सखोल माहिती दिली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात गजानन चव्हाण यांनी एड्स रुग्णांप्रती समाजातील वर्तनाची उदाहरणे सांगितली आणि विद्यार्थ्यांनी संवेदनशीलता तसेच स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. डॉ. अनिल पालवे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे समन्वयन आयक्यूएसी समन्वयक डॉ. राहुल पाटील यांनी केले. डॉ. आर. एस. जावळे आणि डॉ. धरती घरत यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहकार्य केले.या जनजागृती कार्यशाळेस बी.एससीतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# ‘केबीपी’मध्ये नेत्रचिकित्सा शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात २८ नोव्हेंबर रोजी बारावी बोर्ड परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. हे शिबिर महाविद्यालयाच्या आरोग्य आणि कल्याण समिती तर्फे, लायन्स क्लब आणि आयरिस आय हॉस्पिटल यांच्या सहयोगाने घेण्यात आले.

हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. शिबिराचे उद्घाटन कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य वरकड यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनावेळी आरोग्य आणि कल्याण समितीच्या चेअरमन डॉ. अश्विनी पांडे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना नियमित नेत्र तपासणीचे महत्त्व विशेषतः परीक्षा काळात दृष्टी आरोग्य जपण्याच्या दृष्टीने अधोरेखित केले.

विविध शाखांतील मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या नेत्र आरोग्याची काळजी घेणे तसेच येणाऱ्या परीक्षांसाठी त्यांची दृष्टी सक्षम राखण्यास मदत करणे होता. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी समितीतील सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

# गोदी सुरक्षा व धोकादायक रसायने हाताळणी विषयावर कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने (जेएनपीए) शुक्रवारी, २८ नोव्हेंबर रोजी कामगार आणि रोजगार मंत्रालय (एमओएलई) आणि महानिदेशालय, कारखाना सल्ला सेवा आणि श्रम संस्थान (डीजीएफएएसएलआय) यांच्या सहकार्याने ‘गोदी सुरक्षा व धोकादायक रसायनांच्या हाताळणी’ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते.

जेएनपीए बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर (बीएफसी) येथे आयोजित या कार्यशाळेत बंदर प्रशासन, टर्मिनल ऑपरेटर्स, सुरक्षा तज्ज्ञ, आपत्कालीन प्रतिसाद पथके आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी सहभाग घेतला. बंदरांवर हाताळल्या जाणाऱ्या धोकादायक मालाविषयी जागरूकता वाढवणे आणि कार्यप्रणालीतील सज्जता अधिक बळकट करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.

हा उपक्रम म्हणजे आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींचा नियमित बंदर कार्यप्रणालीमध्ये समावेश करून एक सक्षम, सुरक्षित आणि नियमांचे पालन करणारा कार्यपरिसर निर्माण करण्यासाठी जेएनपीएच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे.

या कार्यशाळेत तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालील तांत्रिक सत्रांची मालिका होती ज्यात महत्त्वाच्या सुरक्षा विषयांचा समावेश होता.

१. धोकादायक पदार्थांच्या हाताळणीसंदर्भातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियमांचे विहंगावलोकन करणेसहभागींना बंदर परिसंस्थेमध्ये धोकादायक पदार्थांच्या हालचाली नियंत्रित करणाऱ्या प्रमुख नियामक चौकटी,, आंतरराष्ट्रीय अधिवेशने तसेच कायदेशीर बंधने याबाबत सहभागींना माहिती देण्यात आली.

२. धोकादायक माल हाताळण्यात क्षमता आणि पर्यवेक्षण तज्ज्ञांनी अपघात टाळण्यासाठी आणि सुरक्षित कामकाजासाठी प्रशिक्षित कर्मचारी, कौशल्य विकास आणि योग्य पर्यवेक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले.

३. बंदर परिसरातील किरणोत्सर्ग संरक्षण आणि आपत्कालीन तयारी या सत्रामध्ये किरणोत्सर्ग सुरक्षिततेसाठी आवश्यक प्रोटोकॉल, निरीक्षण यंत्रणा आणि किरणोत्सर्गाशी संबंधित आपत्कालीन परिस्थितींना सामोरे जाण्यासाठीची तयारी यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

४.धोकादायक रासायनिक दुर्घटनांपासून बंदर सुरक्षा डीजीएफएएसएलआयच्या तज्ज्ञांनी बंदर परिसरातील रासायनिक धोक्यांची ओळख, प्रतिबंधात्मक सुरक्षा उपाययोजना आणि दुर्घटना नियंत्रणासाठीच्या विशेष रणनीती यांवर मार्गदर्शन केले.

५. धोकादायक रासायनिक अपघातांमुळे उद्भवणाऱ्या वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितींचे निवारणवैद्यकीय व सुरक्षा तज्ज्ञांनी प्रथमोपचार, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, आरोग्य यंत्रणांशी समन्वय आणि घटनेनंतरची व्यवस्थापन प्रक्रिया याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला जेएनपीएचे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांच्यासह जेएनपीएचे सर्व विभागप्रमुख व मुख्य अतिथी अणुऊर्जा नियामक मंडळाचे (एइआरबी) अध्यक्ष दिनेश कुमार शुक्ला, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (एनडीएमए) माजी सदस्य आणि एचएसई ग्रुप, बीएआरसीचे माजी संचालक डॉ. डी. एन. शर्मा, डीजीएफएएसएलआयचे उपमहासंचालक सुमित रॉय, आयआयटी मुंबई येथील रासायनिक अभियांत्रिकीचे प्राध्यापक डॉ. संदीप रॉय आदी मान्यवर उपस्थित होते. एईआरबी, बीएआरसी, आयआयटी बॉम्बे आणि डीजीएफएएसएलआय येथील येथील वरिष्ठ तांत्रिक तज्ज्ञांनीही या कार्यक्रमात सहभाग घेतला आणि मौल्यवान वैज्ञानिक, नियामक आणि कार्यान्वयन संबंधी मार्गदर्शन केले.



**पनवेल : वारकरी संप्रदाय प्रसारक मंडळ भानघरतर्फे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी शांताराम पोपटा, वसंत पोपटा तसेच नवीन पनवेल युवा मोर्चाचे शहराध्यक्ष मयूर कदम आदी उपस्थित होते. आयोजक मंडळ, ग्रामस्थ व भाविकांनी त्यांचे स्वागत करून सत्कार केला.**



**उरण : नगराध्यक्षपदाच्या भाजप महायुतीच्या उमेदवार शोभा कोळी-शाह व पती भाजप नेते कौशिक शाह यांनी मतदानाचा हक्क बजावला.**

**पनवेल : तालुक्यातील खानाव गावातील विठ्ठल मंदिरात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला मंगळवारी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी खानाव गावचे ग्रामस्थ बाळाराम पाटील, अनंता पाटील, आकाश शेळके, बळीराम भोईर आदी उपस्थित होते.**



# मोहोपाड्यात ‘रोटरी’तर्फे नेत्रचिकित्सा शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल आणि रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षातील चौदा नेत्रचिकित्सा आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीरित्या झाला.

अध्यक्ष विजय बी.पाटील आणि सेक्रेटरी गणेश वर्तक माजी अध्यक्ष गणेश काळे यांच्याहस्ते गणेश पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या शिबिरामध्ये एकूण ८० रुग्णांनी सहभाग नोंदवला आणि त्यापैकी ३० रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पीटल पनवेल येथे दाखल करण्यात आले आहे.



या वेळी शंकरा हॉस्पीटलचे व्यवस्थापक प्रकाश पाटील, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष गणेश काळे, शशीकांत शानभाग काका, गणपती देवस्थानचे सदस्य धनंजय जोशी यांची उपस्थिती लाभली. उमा संदीप मुंढे यांच्या सहकार्याने व गणपती मंदिर देवस्थान समितीच्या सहकार्याने या परीसरात हे शिबिर यशस्वीरित्या होत आहे, त्याबद्दल अनेक गावागावांमध्ये, वाडी वस्त्यांमध्ये या उपक्रमाची नागरीकांकडून स्तूती व कौतुक करण्यात येत आहे.



**पनवेल : चौथुबाई हरी ठाकूर यांच्या १७व्या पुण्यतिथीनिमित्त न्हावाखाडी उत्तरपाडा येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आदरांजली वाहिली. या वेळी न्हावा ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, नवनीत ठाकूर, सुभाष कडू, चेतन ठाकूर, मदन ठाकूर, कांतिलाल म्हात्रे, नरेश मोकल, शिवाजी अहिरे आदी उपस्थित होते.**

# दत्त जयंतीच्या कार्यक्रमात उमेश चौधरी यांचे गायन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दत्तजयंतीनिमित्त आयोजित भक्तिमय कार्यक्रमात प्रसिद्ध संगीतकार व गायक पं. उमेश चौधरी यांनी आपल्या सुमधूर गायनाने उपस्थितांचे मन मोहून टाकले.

तळोजे मजकूर योगीनगर (धोंडळी) परिसरात दरवर्षीप्रमाणे भक्तिभाव आणि अध्यात्मिक उत्साहात ‘श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव’ आयोजित करण्यात आला. श्री नवनाथ सेवा मंडळ, योगीनगर (धोंडळी) यांच्या वतीने आयोजित हा उत्सव स्थानिक भक्तांसह संपूर्ण परिसरातील भाविकांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण मानला जातो. मुख्य आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उमेश चौधरी यांचे शास्त्रीय गायन व अभंगवाणी सादर झाली.

या कार्यक्रमाला महंत यशवंत महाराज यांची आशिर्वादपर प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनीही उपस्थिती दर्शविली. पं. उमेश चौधरी यांच्या गायनाला अक्षय चौधरी आणि मंगेश चौधरी यांनी संगीत साथ दिली. तबल्यावर प्रसिद्ध तबलावादक प्रसाद पाध्ये, पखवाजावर ॲड. सूरज गोंधळी, हार्मोनियमवर सुप्रिया जोशी तर टाळ वाद्यावर गुरुदास कदम या अनुभवी कलाकारांची उत्तम साथ लाभली. सूत्रसंचालन व निवेदनाची जबाबदारी सोपान आडव यांनी पार पाडली.



**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व भाजप नेते राजेंद्र पाटील यांचे वडील माजी सरपंच कै. ह.भ.प. हरिश्चंद्र पाटील यांची ३२वी पुण्यतिथी आणि आई कै. अनुसया पाटील यांच्या १८व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कोळखे येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत तसेच पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी जाऊन आदरांजली वाहिली.**

# पनवेलकरांनी अनुभवली रामायण कथा

## केईएस विद्यालयाच्या स्नेहसंमेलनात सादरीकरण

**पनवेल : वार्ताहर**

रामायणमध्ये घडलेल्या इतिहासाला विध्यार्थीना रामायण या नाट्यतुन सादरीकरण केले. या वेळी पनवेलकरांना रामायण पाहण्याची संधी मिळाली. पनवेल येथील कोकण एज्यकेशन सोसायटीच्या इंदुबाई वाजेकर इंग्लिश मिडीयम विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन शुक्रवारी (दि.२८) झाले.

शाळेतील विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वेळी यांच्यासह चेअरमन व्ही. सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ आदींसह पालक मोठ्य़ा संख्येने उपस्थित होते.

रामायणामध्ये घडलेल्या संपूर्ण इतिहास के.ई.एस इंदुबाई वाजेकर स्कूलमधील इयत्ता आठवी, नववी, दहावीतील १०६ विद्यार्थी, विद्यार्थीनी यांनी एकत्रित येत. रामायण कथा सादरीकरण केले. विशेष करून चेअरमन व्ही. सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ यांच्या मार्गदर्शनाखली अवणी देशपांडे, विनोधीनी, सायली शिंदे, सुचिता म्हात्रे, पूनम, पल्लवी, प्रगती, आज्मा, प्राजक्ता, भक्ती, दीपा या शिक्षिका यांनी मेहनत घेऊन ही कथा तयार केली त्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. तसेच आरती वर्मा, संजीवनी या शिक्षकांनी डोंबारीनृत्य तयार केलेले विद्यार्थीने नृत्य सादर केले.



**पनवेल : येथील महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या प्रयत्नाने भिंगारी नांदगाव विसर्जन घाटावर नवीन लाईट बसविण्यात आल्या आहेत.**

# नागोठणे मोहल्ल्यात पाच फ्लॅटमध्ये चोरी

## ■ लाखो रुपयांचा ऐवज लंपास : नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**नागोठणे : बातमीदार**

अज्ञात चोरट्यांनी नागोठणेचे माजी सरपंच पै. फरमानशेठ दफेदार यांच्या बंगल्याच्या पाठीमागील भागात सोमवारी (दि. १) रात्री हुजरा मोहल्ल्यातील मिर्जा नाडकर आपार्टमेंट मधील एक फ्लॅट व सिदराह आपार्टमेंटमधील चार फ्लॅट असे बंद असलेले एकूण पाच फ्लॅट फोडून लाखो रुपयाचा ऐवज व १८ हजार रुपये रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली असल्यामुळे नागोठणकर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.





चोरी झालेल्या फ्लॅटमध्ये कोणीही नसल्यामुळे पुढील होणारा अनर्थ टळला. मागील काही महिन्यांपूर्वीदेखील नागोठण्यात चार फ्लॅट फोडून रोख रक्कम व ऐवज लंपास झाला होता. त्या चोरीचा अजून तपास लागला नसताना पुन्हा नागोठण्यात घरफोडी झाल्यामुळे पोलिस प्रशासनावर नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. हुजरा मोहल्ल्यातील घरफोडी झाल्याचे समजताच नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी यांनी घटनेस्थळी स्वतः जाऊन घरफोडी प्रकारची पाहणी करून तेथील रहिवासींना दिलासा दिला. तसेच पोलीस यंत्रणादेखील कामाला लावली.

दरम्यान, काही महिन्यांपासून नागोठणे शहरात घरफोडीचे प्रमाण वाढले असून याकडे कर्तव्यदक्ष डॅशिंग जिल्हा पोलीस अधिक्षक आंचल दलाल मॅडम यांनी जातीने लक्ष देऊन पोलिसांची गस्त वाढवून संबंधित अधिकारी वर्गाला योग्य त्या सूचना देऊन नागोठणेकर जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

सोमवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी नागोठणे हुजरा मोहल्ल्यातील मिर्जा नाडकर आपार्टमेंटमधील रहिवाशी शादाब कुटकी यांच्या बंद फ्लॅटमधील दोन सोन्याच्या अंगठ्या, २ ते ३ हजार रुपये रोख रक्कम, सिदराह आपार्टमेंट मधील रहिवाशी सलाम पानसरे यांच्या बंद फ्लॅट मधील मुलीच्या लग्नासाठी आणलेला इम्पॉर्टन्ट सामानाचे दोन बॉक्स व इतर सामान, वकार अहमद यांच्या बंद फ्लॅट मधील लहान मुलीच्या कानातील सोन्याची रिंग, नाकातील सोन्याची रिंग, हातातील सोन्याचे कडे, अरबाज सय्यद यांच्या बंद फ्लॅटमध्ये काय चोरीला गेले ते समजू शकले नाही तसेच नाजनीन मुतलिब दळवी यांच्या फ्लॅट मधील महिलेच्या कानातील सोन्याचे दोन बटण दोन सेट, तीन अंगठ्या व १५ हजार रोख रक्कम चोरीला गेले असल्याचे फ्लॅटधारकांनी पत्रकारांना सांगितले.

अशा प्रकारे पाच फ्लॅट फोडून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला असून याबाबत अधिक तपास नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन कुलकर्णी करीत आहेत.

# तळगडावर सापडला चोर दरवाजा

## नागरिक, इतिहासकारांमध्ये उत्सुकता

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील ऐतिहासिक तळगड किल्ल्यावर शिवकालीन चोर दरवाजा सापडला असून हा चोर दरवाजा शोधण्याची यशस्वी कामगिरी दुर्गरत्न प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांनी बजावली आहे. तळगडावर कित्येक वर्षे मातीत लुप्त झालेल्या चोर दरवाजाबद्दल प्रतिष्ठानच्या सदस्यांना माहिती मिळताच काही अभ्यासकांकडून गडाची माहिती घेण्यात आली व नकाशाच्या सहाय्याने चोर दरवाजाची शोध मोहीम सुरू करण्यात आली. अखेर या शोध मोहिमेला यश मिळाले व गेली कित्येक वर्षे लुप्त झालेला चोर दरवाजा सापडला.



दुर्गरत्न प्रतिष्ठानच्या सदस्यांनी आपल्या परिश्रमाने दोन मोहिमांमध्ये मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडला गेलेला हा चोर दरवाजा पूर्वीसारखा पूर्णपणे मोकळा केला. यामुळे तालुक्यातील नागरिकांसह तळगडावर येणाऱ्या पर्यटकांनाही हा शिवकालीन चोर दरवाजा पाहता येणार आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी दुर्गरत्न प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

तळा शहरातील या तळगडावर चोर दरवाजा सापडल्याने इतिहासप्रेमी व नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून पहाण्यासाठी शिवप्रेमी भेट देत आहेत.

# फुंडे विद्यालयामध्ये शाळांतर्गत विज्ञान प्रदर्शन



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत मंगळवारी (दि.२) शालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य बी.बी.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. इयत्ता पाचवी ते बारावीच्या प्रत्येक वर्गातील प्रकल्प या प्रदर्शनात मांडण्यात आले होते.

विविध वैज्ञानिक तत्त्वावर आधारित व अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असे प्रकल्प या प्रदर्शनात मांडण्यात आले होते. मुख्य विषय विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी Stem यामध्ये विद्यार्थ्यांनी शाश्वत शेती, कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिकला पर्याय, उद्योनमुख तंत्रज्ञान, मनोरंजनक गणितीय मॉडेलिंग, आरोग्य आणि स्वच्छता, जल संवर्धन आणि व्यवस्थापन या प्रकल्पांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थिनींनी विज्ञानावर आधारित गीताचे सादरीकरण केले. सातवी अ च्या विद्यार्थिनींनी डोळे उघडून बघा व सहावी अ च्या विद्यार्थिनींनी प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा या गीताचे सादरीकरण केले. विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एम.बाबर व एस. एस. पाटील व सेवक वृंद यांच्याकडून पाहणी करण्यात आली. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. इयत्ता पाचवी ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांना प्रदर्शन दाखविण्यात आले. सहभागी स्पर्धकांनी प्रकल्पा विषयी सविस्तर माहिती सांगितली. उत्कृष्ट प्रकल्पाची निवड करून त्या प्रकल्पाला उरण तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी पाठविण्यात येणार आहे.

विज्ञान प्रदर्शन प्रमुख उपशिक्षिका डी. जी. पाटील व सर्व विज्ञान शिक्षक व गणित विषय शिक्षक यांनी हे प्रदर्शन यशस्वी होण्यासाठी खूप मेहनत घेतली. या सर्व प्रकल्पाचे परीक्षण उपशिक्षक एस. डी. म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपशिक्षक एच. एन. पाटील यांनी केले. या प्रदर्शनास विदयार्थ्यांसह पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# खोपोलीत विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोलीतर्फे इकोफ्रेंडली गणपती सजावट स्पर्धा व किल्ले स्पर्धा ही सहा वर्षांपासून घेण्यात येत आहेत.

इकोफ्रेंडली गणपती सजावट स्पर्धेमध्ये खोपोलीमधून एकूण २२ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यात प्रथम मीनल संतोष गायकर, द्वितीय भाविक विश्वास शेडगे, तृतीय अनिल महाले, चतुर्थ अविनाश राऊत, पाचवा राजश्री मुंदडा या सर्व विजेत्यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देण्यात आले. दिवाळीमध्ये किल्ले स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये १० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

यात प्रथम वर्धमान मित्रमंडळ, द्वितीय वीणा नगर येथे मित्रमंडळ, तृतीय स्वामीसमर्थ नगर, चतुर्थ गायकर मित्रमंडळ वरची खोपोली सर्व विजेत्यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या दोन्ही स्पर्धेचे आयोजन माजी अध्यक्ष संजय पाटील यांनी केले होते.



**खोपोली : नगर परिषद निवडणुकीत महायुतीचे नगराध्यक्षाचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांनी आपल्या गावातील मुळगाव शाळेमध्ये सहपत्नी मतदान केले.** (छाया : जयवंत माडपे)


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६. दुरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government/ Government Under Taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/ २५६/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती-क धाकटा खांदा गावातील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पूर्वनिर्मित पावसाळी गटार (Precast Storm Water Drain) बांधणे. | ७,६०,९०,५४१/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०३/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : १/१२/२०५

सही/-
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.६५१/६७४/२०२५



**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
Tal. Panvel, Dist. Raigad

**CORRIGENDUM FOR TENDER NOTICE**

Tender No: PMC/CE/PMAY/212/2025-26-Second Call

**CITY ENGINEER'S OFFICE**
**(PMAY DEPARTMENT)**

**Name of the work :** Mixed Use Development under PMAY with Rehabilitation of Slum Dwellers of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206.

Last date of submission of tender has been extended up to 16/12/2025

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender are available on website www.mahatenders.gov.in. Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document **from 06/11/2025 from 5.00 P.M. to 16/12/2025 up to 3.00 PM.** Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be **16/12/2025 up to 5.00 PM.** Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason thereof.

**Sd/-**
**Additional Commissioner-I**
Panvel Municipal Corporation,
Panvel - 410 206

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.६४९/६७२/२०२५



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे -. आडीवली, ता - पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काच्या मिळकती असुन वा जमीन ही आमचे आशिलांनी खरेदी / विक्री करणे बाबत चर्चा केलेली आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णण**
**मौजे : आडीवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | भोगवटाधारकाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १३६ | ० | २.०४.१० ०.००.०० | २१.९४ पैकी ५.४९ | १. अमृत पांडुरंग पाटील रा. आडीवली, ता. पनवेल, जिल्हा रायगड |
| | | २.०४.१० पैकी ०.५१.०३ | | |
| | | २.०४.१० ०.००.०० | २१.९४ पैकी ५.४८ | २. महेंद्र जगन्नाथ येवले रा. आडीवली, ता. पनवेल, जिल्हा रायगड |
| | | २.०४.१० पैकी ०.५१.०२ | | |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, विक्री, अदला-बदल, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, वारसाहक्क अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक: २/१२/२०२५

सही/-
**ॲड. विजयेंद्र बा. शितोळे**

पत्ता - ०३, श्री हरेकृष्णा को.ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड ४१०२०६
मो. क्र. ८६५७९७७९४१



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**पर्यावरण विभाग**
**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेमार्फत नोंदणीकृत व अनुभव संस्थांकडून Installation of "off-grid solar benches" at various places in Panvel Municipal Corporation area and maintenance for 1 year. याकामासाठी आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकरिता बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक : ०२/१२/२०२५

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/ प्र.क्र.६५०/६७३/२०२५

**(सही/-)**
उपायुक्त (पर्यावरण)
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - बोर्ले, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु. पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| ७५/२ | ०-१७-२० | १.०० | आत्माराम गोमा पाटील जगन गोमा पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. ०२/१२/२०२५.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड मो. क्र. : ९९३०३६९८६१



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत **श्री. कृष्णदेव महादेव दुबल** यांचेकडून खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे योजिले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे -मानघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पध्दती | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ४५/१ | भोगवटादार वर्ग-१ | ०-१४-६० पो.ख. ०-००-४० | ०.६७ |
| | | एकूण ०-१५-०० | |

वर नमूद मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे आत** आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात. सदर **१५ दिवसांचे आत** कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/१२/२०२५

सही/-
**शरद रामचंद्र जाधव, वकील**
(बी.कॉम. एलएल.बी.)
नोंदणी क्र. एम् ए एच-३५८६ / २००८

कार्यालयीन पत्ता : कार्यालय क्र. ००१, तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड- ४१०२०६.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे भेरले, तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे भेरले, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ७८/१/२ | २ | ०-४५-०० | ०-००-०० | ०-४५-०० | ८.२२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २/१२/२०२५

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

## सीकेटी कॉलेजमध्ये आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा

# कांदिवलीच्या ठाकूर कॉलेजला दुहेरी मुकूट





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (अधिकारप्रदत्त स्वायत्त)मध्ये मुंबई विद्यापीठाच्या समन्वयाने आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मुंबई विद्यापीठातील ४२२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे संचालक तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभास सीकेटी कॉलेजचे प्राचार्य व मुंबई शहर झोन १चे उपाध्यक्ष डॉ. एस.के.पाटील, सचिव डॉ.मनोज वर्मा, स्पर्धा सचिव डॉ. व्ही.बी. नाईक, मुंबई उपनगर सचिव डॉ. निलम पाटील यांची उपस्थिती लाभली.

स्पर्धेत मुलांमध्ये प्रथम क्रमांक ठाकूर महाविद्यालय कांदिवली, द्वितीय आर.जे. महाविद्यालय घाटकोपर आणि तृतीय क्रमांक के.ई. श्रॉफ महाविद्यालय कांदिवली यांनी पटकाविला. मुलींच्या विभागामध्ये प्रथम क्रमांक ठाकूर महाविद्यालय कांदिवली, द्वितीय एसआयईएस महाविद्यालय नवी मुंबई आणि तृतीय क्रमांक वर्तक महाविद्यालय वसई यांनी प्राप्त केला.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. भरत जितेकर व प्रा. प्रतिज्ञा पाटील तसेच जिमखाना विभागाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## राज्यस्तरीय सिनियर तायक्कांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लातूर येथे ५ ते ७ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय सिनियर तायक्कांडो स्पर्धेसाठी रायगड तायक्कांडो असोसिएशनमार्फत सचिव सुभाष पाटील यांनी जिल्ह्याचा संघ जाहीर केला आहे.



मुलांच्या संघामध्ये उपेंद्र महतो, स्मित पाटील, विनायक शिर्के, शुभम पोवार, आर्य विनोद घाग, ओम टेंगळे, विशाल सानप, दर्शन नाईक यांचा समावेश असून प्रशिक्षक म्हणून अनिल म्हात्रे काम पाहणार आहेत.

मुलींमध्ये गायत्री भंडार, सेजल कानेकर, अनन्या चितळे, रोहिणी कांबळे, तनुजा पाटील, जान्हवी पाटील, तर प्रशिक्षक प्राजक्ता अंकोलेकर आणि व्यवस्थापक साहिल पालेकर आहेत.

पूमसेत शुभम पोवार, सेजल काणेकर, सनी पासवान, रतिका अहुजा, दिनेश म्हात्रे, सोहम कुरघोडे, प्रशांत घरत, प्राजक्ता अंकोलेकर, मुग्धा भोसले, राज बादल, दक्षय ठोंबरे, तनिष कोनकर, भाग्यश्री बोंडवे, ऋतुजा तुपसुंदर व प्रशिक्षक अक्षता पाटील आहेत.

या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू तायक्कांडो ऑफ फेडरेशन इंडियाच्या वतीने ११ ते १४ डिसेंबर या कालावधीत हैदराबाद येथील जीएमसी बालयोगी स्टेडियममध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे बॉक्सिंग स्पर्धेत यश

### अल्फिया अन्सारीची राज्यस्तरीय निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी अल्फिया शेहजाद अन्सारी हिची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



राज्य युवक व क्रीडा सेवा संचालनालय अंतर्गत क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद आणि रायगड बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विभागीय शालेय बॉक्सिंग स्पर्धा २०२५-२६चे आयोजन मुंबईतील धारावी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स् येथे करण्यात आले होते. यात अल्फिया अन्सारीने घवघवीत यश प्राप्त केले असून तिची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

याचबरोबर प्रित विलास भोईर, सुमित मुकेश चौधरी, नम्रता सुनील सलते, इशिता प्रशांत शिंदे यांना कांस्यपदक मिळाले आहे. खेळाडूंना शिक्षक प्रवीण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जुनून रिंक फुटबॉल स्पर्धेस उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

टिळक ज्युनिअर कॉलेजतर्फे जुनून रिंक फुटबॉल स्पर्धा २०२५चे भव्य आयोजन करण्यात आले. इंटर-स्कूल आणि इंटर-अकॅडमी पातळीवरील झालेल्या या स्पर्धेत १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली अशा चारही गटांमध्ये एकूण सुमारे ५६ संघांनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रीय फुटबॉलपटू जॉयदीप मजूमदार उपस्थित होते. अध्यक्षस्थानी टिळक ग्रुप ऑफ स्कूल्स अ‍ॅण्ड कॉलेजेचे संचालक डॉ. अजित कुरुप, अन्य मान्यवर एनएमएमसी स्पोर्ट्स कमिटीचे सदस्य धनंजय वनमाळी उपस्थित होते. स्पर्धेचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

## 'आरडीसीए'च्या स्पर्धेत रोशन अकॅडमी अंतिम फेरीत



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाने उपांत्य फेरीच्या झालेल्या सामन्यात प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघावर एकतर्फी विजय प्राप्त करत अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला आहे.

रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाचा अंतिम सामना जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाबरोबर लवकरच होणार आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना प्रतिक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघाचा डाव ३५.४ षटकात सर्व गडी बाद अवघ्या ३९ धावसंखेवर संपला. त्यामध्ये यजुर्व घरतच्या १३ धावा वगळता अन्य कोणताही खेळाडू दुहेरी अंकातील धावसंख्या गाठू शकला नाही. रोशन अकॅडमीकडून निखिल अहिरवाल याने सर्वाधिक चार, समर्थ यादवने तीन, तर आर्यन गाडेने दोन फलंदाज बाद केले.

अवघ्या ४० धावांचे लक्ष घेऊन फलंदाजीसाठी आलेल्या रोशन अकॅडमी संघाने १२.५ षटकात दोन गडी गमावत ४० धावांचे लक्ष्य पूर्ण केले. त्यामध्ये मीत पाटील याने सर्वाधिक नाबाद १४ धावा केल्या. पनवेल संघाकडून अधिराज जाधव याने एक फलंदाज बाद केला. रोशन अकॅडमी संघाचे प्रशिक्षक रोशन अडे यांनी संघाने केलेल्या कामगिरीवर आनंद व्यक्त करत अंतिम सामन्यासाठी शुभेच्छा दिल्या.



## मोहोपाडा प्रिआ स्कूल क्रीडा स्पर्धेत अव्वल स्थानी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

स्वामीनारायण गुरूकुल स्कूल चौक येथे झालेल्या स्पर्धेत प्रिआ स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत घेत अव्वल स्थान पटकावले. ३० संघांना मागे टाकत त्यांनी विजेतेपद पटकावले.

स्पर्धेत अंडर १२, १४ आणि १६ या तिन्ही गटांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय ठरली. खेळाडूंनी एकूण २९ सुवर्ण आणि ६४ रौप्यपदके जिंकत आपला झेंडा फडकवला. या दणदणीत विजयाबद्दल प्रशिक्षक, पालक आणि संपूर्ण शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अ‍ॅथलेटिक्स किड्स कप स्पर्धेत सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलची चमक



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

पोलीस मुख्यालय कळंबोली येथे आयोजित करण्यात आलेल्या अ‍ॅथलेटिक्स किड्स कप स्पर्धेत उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे.

सात वर्षाखालील गटात आरुष यादव याने द्वितीय, आठ वर्षाखालील गटात कनक चौधरी व अहान इचले तृतीय, नऊ वर्षाखालील गटात काव्या पारिंगे प्रथम, ओवी झणझ द्वितीय, ११ वर्षाखालील गटात चंचल चौधरी प्रथम, तर १२ वर्षाखालील गटात अनिकेत सिंगा याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. सर्व विद्यार्थ्यांचे व क्रीडा शिक्षक संग्राम फोफेरकर यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी स्कूल कमिटीतर्फे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

## वैभव सूर्यवंशीच्या नावावर नवा विक्रम

**कोलकाता : वृत्तसंस्था**



भारताचा युवा क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशीने मंगळवारी (दि. २) सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी टी-२० स्पर्धेमध्ये शतक झळकावत इतिहास रचला आहे. ईडन गार्डन्सवर महाराष्ट्र संघाविरुद्ध १४ वर्षीय वैभवने शतकी खेळी केली. अशी कामगिरी करणारा तो देशातील सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या बिहारने २० षटकांत ३ बाद १७६ धावा केल्या. वैभवने केवळ ६१ चेंडूत नाबाद १०८ धावा केल्या. त्याच्या या झंझावती खेळीत सात चौकार आणि सात उत्तुंग षटकारांचा समावेश होता. त्याने २०व्या षटकात आपले शतक पूर्ण केले. वैभवला सुरुवातीच्या देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमध्ये धावा काढण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. मागील तीन सामन्यात अनुक्रमे १४, १३ आणि ५ धावा केल्या होत्या. त्याच्याकडून एका मोठ्या खेळीची अपेक्षा होती. त्याने मंगळवारी ही अपेक्षा पूर्ण केली.


वर्ष ४२ वे ||ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना १९८३

**मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह**

**श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**




अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सदगुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये **श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर,** यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरु चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ||१३||, शके १९४७, बुधवार दि.०३/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ||१५|| | पौर्णिमा पौर्णिमा श शके १९४७, शुक्रवार दि.०५/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरुबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**: कार्यक्रम :**

| | |
|---|---|
| | **बुधवार दि. ०३/१२/२०२५** |
| सकाळी ८.३० ते १० दिंडी सोहळा संगीत भजन | देवसागर साधक समाज बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा), बुवा गणपत ठाकूर, नितिन ठाकूर पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे (न्हावा) सर्व गुरुबंधू भगिनी |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब, पुणे. ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळूण श्री. रमण ठाकूर, न्हावाखाडी, श्री. अरूणशेठ ठाकूर |
| दुपारी २ ते ४ : संगीत भजन | भावभक्ती महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर गायीका सो. रत्नप्रभा घरत, श्रीमती. हिरुबाई घरत, सौ. चंद्रप्रभा घरत. सौ. आनंदी घरत श्री. गुरुकृपा प्रासदिक भजन मंडळ, खारकोपर गायीका: सुप्रिया घरत, पखवाज : तुषार घरत (चिर्ले उरण) |
| दुपारी ४ ते ६ : संगीत भजन | संत जनाबाई प्रासदिक भजन मंडळ गायिकाः सौ. पुनम ठाकूर, सौ. रुपम वास्कर, हर्षद फडके, पखवाजः केतन फडके |
| सायं ६ ते ७ : आरती | माऊलींची आरती |
| सायं ८ ते ९ : संगीत भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर बुवा : वसंतशेठ पाटील, देवानंद कोळी, नितीन ठाकूर (खारकोपर), पखवाज : श्री. गौरव म्हात्रे (गव्हाण), तुकाराम कोळी (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ : किर्तन | ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे, श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल) वादक ह.भ.प. आदित्य पाटील, गायक : ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग |
| | **गुरुवार दि.०४/१२/२०२५** |
| सकाळी ८ ते १० : भजन | श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर, बुवा : रशिक कानडा आणि मंडळी पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा), तबला रुतुजा कानडा |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब. पुणे. ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळूण |
| दुपारी २ ते ४ | श्री विश्वभर भजन मंडळ, गव्हाण, गायक हेमंत कोळी, पखवाज प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ५ | विठ्ठल रुखमाई हरिपाठ मंडळ, कोपर, गायीका सौ. अनुसया घरत, सो. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील. सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर, वादक : दिनेश घरत |
| सायं ५ ते ६ | दत्त जन्मोत्सव |
| सायं ८ ते ९ : भजन | एकादशी भजन मंडळ, न्हावे- बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ : किर्तन | श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज पाटील आणि मंडळ, कुंडेवहाळ |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर. पद्माकर ठाकूर (न्हावा खाडी). पांडूरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर, (गव्हाण) सर्व गुरुबंधू भगिनी |
| | **शुक्रवार दि.०५/१२/२०२५** |
| सकाळी ८ ते १० : भजन | नादब्रम्ह साधना भजन मंडळ (रांजणपाडा ओवेपेठ) बुवा : निवृत्ती चौधरी, मंगेश चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), पखवाज: निलेश पाटील |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता | श्री बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी |

देवसागर साधक समाज श्री स. स. बाळकृष्ण महाराज यांच्या १२५ वा जयंती निमीत्त दिंडी सोहळा बुधवार दि. ०३/१२/२०२५ रोजी सकाळी ०८.३० ते १०.३० वाजे पर्यंत.

कार्यक्रमाचे ठिकाण : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल.

**व्यवस्थापक :** देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) शिवाजीनगर - गव्हाण - न्हावेखाडी - कोपर (संचलित)

**संयोजक :** श्री. रामशेठ ठाकूर माजी खासदार आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com